पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०८ ■ बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# मनपाकडून 'त्या' वादग्रस्त दुकानाचे मोजमाप!




## राजेश मिश्रांनी केली होती मागणी, दुकानाआडून चालत होता भलताच प्रकार

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील गजबजलेल्या गांधी रोड परिसरातील एका सौंदर्य प्रसाधने दुकानातून भलताच प्रकार सुरू असल्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार समोर आल्याने संपूर्ण अकोला शहरात खळबळ उडाली आहे. महिलांचा विश्वास संपादन करणारे 'बिंदी घर' नावाचे दुकान प्रत्यक्षात लैंगिक शोषण, ब्लॅकमेलिंग आणि धर्मांतराच्या दबावाचे केंद्र असल्याचे उघडकीस आल्याने या वादग्रस्त दुकानाचे अतिक्रमण काढा, अशी मागणी माजी नगरसेवक राजेश मिश्रा यांनी केली होती. त्याची दखल घेत महानगरपालिकेल्यावतीने बिंदी घरचे मोजमाप करण्यात आले आहे. तसेच अटक करण्यात आलेल्या दोन आरोपीपैकी एक जण सर्वोपचार रूग्णालयात उपचारार्थ भरती आहे.

पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी दुकानात येणाऱ्या महिला ग्राहकांशी गोड बोलून ओळख वाढवत. विश्वास संपादन केल्यानंतर मोबाइल क्रमांक मिळवून 'नवीन माल आला आहे' अशा बहाण्याने पुन्हा दुकानात बोलावले जात होते. याच वेळी महिलांशी अश्लील वर्तन करून त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ चोरट्या पद्धतीने तयार केले जात होते. मैत्रीच्या नावाखाली विश्वासघात केला जात होता. या प्रकरणाने भयावह वळण घेतले तेव्हा आरोपींनी संबंधित महिलेला व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. 'धर्मातर केल्याशिवाय व्हिडीओ हटवले जाणार नाहीत,' असा थेट दबाव टाकण्यात आला. बदनामीची भीती व सामाजिक दबावामुळे पीडिता दीर्घकाळ गप्प राहिली. याच संधीचा गैरफायदा घेत आरोपींनी तिला एका फ्लॅटमध्ये नेऊन वारंवार अत्याचार केले. सिटी कोतवाली पोलिसांच्या माहितीनुसार, हा अमानवी अत्याचार २०२४ ते २०२६ या कालावधीत सुरू होता. अखेर धैर्य एकवटून पीडितेने तक्रार दाखल केली आणि या घृणास्पद रॅकेटचा पर्दाफाश झाला. दरम्यान, पीडितेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९२/२०२६ अंतर्गत सामूहिक बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात चार आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.



### राजेश मिश्रा यांची वादात उडी

वादग्रस्त बिंदी घर प्रकरणात माजी नगरसेवक राजेश मिश्रा यांनी उडी घेत या जागेचे मोजमाप करण्याची मागणी केली. तसेच आपल्या कार्यकर्त्यांसह या ठिकाणी पोहचून मिश्रा यांनी घडलेल्या घटने संदर्भात संताप व्यक्त केला. तसेच महापालिका यंत्रणेकडे अतिक्रमण काढून टाका अशी मागणी केली. अतिक्रमण हटवण्याबाबत महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई सुरू केली आहे. बुधवार, ४ फेब्रुवारीला दुपारी मनपा आयुक्त सुनील लहाने यांच्या आदेशानुसार, उपायुक्त विजय पारतवार, पूर्व झोनचे प्रमुख राजेश सरप यांनी दिलेल्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाचे चंद्रकांत इंगळे, राहुल राऊत, प्रवीण मिश्रा यांनी बिंदी घर जागेचे मोजमाप केले असून, वृत्त लिहिपर्यंत कारवाई सुरू होती. ही जागा अतिक्रमणात असेल तर इतके दिवस कारवाई का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



### मानवी मूल्यावर घाला घालणारा प्रकार

हा प्रकार केवळ कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजातील महिलांच्या सुरक्षिततेवर, विश्वासावर आणि मानवी मूल्यांवर घाला घालणारा आहे. धर्माच्या नावाखाली दबाव, ब्लॅकमेलिंग व लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्वच स्तरातून होत आहे.




# लोकसभेत गोंधळ; खासदार प्रशांत पडेळेंसह आठ जणांचे निलंबन!

वृत्तसंस्था ४ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील मजकुराबद्दल बोलण्यास परवानगी नाकारल्याच्या मुद्यावरून लोकसभेत मंगळवारी, सलग दुसऱ्या दिवशी गदारोळ झाला. या गदारोळात अध्यक्षांसमोरील टेबलावर चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या तसेच पीठासीन अधिकाऱ्यांवर कागदाचे तुकडे भिरकावणाऱ्या आठ खासदारांना निलंबित करण्यात आले. त्यात काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका खासदाराचा समावेश असून भंडार-गोंदीयाचे प्रशांत पडोळे यांचाही समावेश आहे.

लोकसभेचे कामकाज मंगळवारी दुपारी सुरू झाले तेव्हा राहुल गांधी यांनी पुन्हा माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकाचा नामोल्लेख टाळून चीनच्या घुसखोरीच्या प्रसंगाचा तोच संदर्भ देण्यास सुरुवात केली. चीन आणि पूर्व लडाखमध्ये लष्कराचे जवान हुतात्मा झाले तो मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे त्यांनी सांगितल्यावर भाजप सदस्यांनी त्याला जोरदार आक्षेप घेतला. पीठासीन अधिकारी कृष्णकुमार टेनेटी यांनी, 'तुम्हाला बोलण्यास परवानगी देण्यात आली आहे परंतु लोकसभाध्यक्षांनी या मुद्यासाठी परवानगी नाकारल्याने तो मुद्दा मांडता येणार नाही', असे राहुल गांधी यांना सांगितले. यावर संतापलेल्या राहुल यांनी, 'मी विरोधी पक्षनेता आहे. मला बोलण्यासाठी कोणाकडून परवानगीची काय गरज आहे', असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजु यांनी संसदेत प्रत्येक सदस्य अध्यक्षांच्या परवानगीनेच बोलतो, असे निदर्शनास आणून दिले. तरीही राहुल गांधी यांनी आपला मुद्दा न सोडल्याने टेनेटी यांनी इतर वक्त्यांची नावे पुकारण्यास सुरुवात केली. त्यानंतर काँग्रेस खासदार घोषणाबाजी करत हौद्यात उतरले.

# शरद पवार मुख्यमंत्री फडणवीसांवर संतापले!

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला असून यावरून राजकीय दावे-प्रतिदावे केले जात आहेत. अजित पवार यांच्याशी आमची सर्व चर्चा झाली होती आणि लवकरच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची अधिकृत घोषणा केली जाणार होती, असं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध नेत्यांकडून सांगितलं जात आहे. मात्र अशी कोणतीही चर्चा अजित पवार यांनी आमच्याशी केली नव्हती, असं राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल





पटेल यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केलं. या पार्श्वभूमीवर आज बारामती इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाचा समाचार घेतला आहे.

तुम्ही विलीनीकरणाबद्दल भाष्य केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात उडी घेतली आणि राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली असती तर अजितदादांनी मला त्याबाबत कल्पना दिली असती. तसंच विलीनीकरणाचा मुद्दा होता तर पवारसाहेब एनडीएसोबत येणार होते का? असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. त्यावर तुमची प्रतिक्रिया काय?' असा प्रश्न आज बारामती येथील पत्रकार परिषदेदरम्यान शरद पवार यांना विचारण्यात आला.

## काँग्रेस नेत्यांच्या भूमिकेचा तपास व्हावा

# प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ करतील काय तपास

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला:** महापालिकेत शहर सुधार समितीची सत्ता आली. भाजपची प्रणित ही सत्ता आहे. काँग्रेसने अकोला पश्चिम मध्ये दमदार प्रदर्शन केले. पण, अकोला पुर्व भागात हिंदू मतदार संघात काँग्रेसचे नेत्यांनी निवडणुकीस उभे राहण्याचे धाडस का दाखविले नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. काँग्रेस नेत्यांनी शिवसेना (उबाठा) ला सर्व जागा लढण्यास दिल्या होत्या काय असा प्रश्न उपस्थित होतो. काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, प्रकाश तायडे, कपिल रावदेव, सौरभ बबनराव चौधरी, अविनाश देशमुख, पुजा रमाकांत खेतान त्याच बरोबर शहरात राहणारे काँग्रेसचे इतर दिग्गज नेता व त्यांचे मुलांनी महापालिका इलेक्शन लढण्याचे धाडस का दाखविले नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ पक्षातील वरिष्ठ पदांवर दावा करत हे नेते लोकशाही उत्सवात मागे का होते याचा तपास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ करतील काय अशी विचारणा काँग्रेस कार्यकर्ते विचारत आहे.

महापालिका निवडणुकीत काँग्रेस नेत्यांनी निवडणुकीपुर्वीच हार मानत निवडणुकीला उभे राहण्याचे धाडस दाखविले नाही. त्यामुळे आपसूक त्या ठिकाणी भाजप विजयी झाली. इतर पक्षाचा विजय झाला.

# आडोशी बोगद्याच्या तोंडाशी टँकर उलटला...!

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**पुणे :** मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी आडोशी बोगद्याजवळ घडलेल्या गंभीर अपघाताने एकच खळबळ उडवून दिली. अत्यंत ज्वलनशील प्रोपलीन गॅस वाहतूक करणारा टँकर बोगद्याच्या प्रवेशद्वाराजवळ उलटल्याने मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला. अपघातानंतर टँकरमधून गॅस गळती सुरू झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईकडे जाणारी वाहतूक तत्काळ थांबविण्यात आली. परिणामी द्रुतगती मार्गावर भीतीचं वातावरण पसरले असून महामार्ग पूर्णपणे ठप्प झाला होता. वाहतूक १५ तासांपासून ठप्प असल्याची माहिती समोर आली आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर टँकर पुण्याहून मुंबईच्या दिशेने येत होता. आडोशी बोगद्याजवळील अवघड वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने टँकर थेट बोगद्याच्या तोंडाशी उलटला. अपघातानंतर काही वेळातच टँकरमधून प्रोपलीन गॅसची गळती सुरू झाली. हा गॅस अत्यंत ज्वलनशील असल्याने कोणताही अपघात किंवा ठिणगी मोठ्या स्फोटाला कारणीभूत ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, आयआरबी, देवदूत यंत्रणा, हेल्प




| Plan | 1 Month | 3 Months | 6 Months | 12 Months |
|---|---|---|---|---|
| 50mbps | 400 | 1000 | 2000 | 4000 |
| 100mbps | 500 | 1250 | 2500 | 5000 |
| 150mbps | 700 | 1750 | 3500 | 7000 |
| 200mbps | 900 | 2250 | 4500 | 9000 |
| 250mbps | 1050 | 2625 | 5250 | 10500 |
| 300mbps | 1150 | 2875 | 5750 | 11500 |
| 500mbps | 1400 | 3500 | 7000 | 14000 |


# टीईटी चा निकाल केवळ 11 टक्के!

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने मंगळवारी (ता. ३) 'टीईटी'चा (शिक्षक पात्रता परीक्षा) निकाल जाहीर केला. त्यात चार लाख ४६ हजार ७३० पैकी अवघे ११.२८ टक्केच (५० हजार ३६९) भावी शिक्षक उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत तब्बल तीन लाख ९६ हजार ३२५ परीक्षार्थी नापास झाले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी निकाल दिला आणि महाराष्ट्रातील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील दीड लाखांहून अधिक शिक्षकांची झोप उडाली. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयाचा पुनर्विचार करावा, यासाठी राज्यातील शिक्षक संघटनांनी राज्य सरकारकडे मागणी केली. आंदोलने देखील केली. पण, राज्य सरकारला तशी याचिका दाखल करण्याचा अधिकार नसल्याची बाब समोर आली. आता शिक्षकांना केंद्र सरकारच्या माध्यमातून काहीतरी सकारात्मक निर्णयाची अपेक्षा आहे.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या शिक्षकांचे वय सध्या ५३ वर्षांपर्यंत आहे, त्यांना देखील टीईटी द्यावी लागणार आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांच्या मुदतीत 'टीईटी' उत्तीर्ण न होणाऱ्या शिक्षकांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई होणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या 'टीईटी'साठी राज्यभरातील ५० हजारांहून अधिक शिक्षक देखील बसले होते. त्यातील अनेकांना अपयश आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत आहे.

### ३६ उमेदवारांचा निकाल राखून ठेवला

'टीईटी'त गुण वाढवून देऊन पास करण्यासंदर्भातील ऑडिओ क्लिक व्हायरल झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी मुरगुड (जि. कोल्हापूर) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस या प्रकरणाची सखोल तपास करीत आहेत. त्यामळे या प्रकरणातील ३६ संशयित उमेदवारांचे निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने राखून ठेवले आहेत. त्यात पेपर एकमधील १६ आणि पेपर दोनचे २० उमेदवार आहेत. दुसरीकडे या परीक्षेत एक प्रश्नाच्या उत्तराबद्दल अनेक उमेदवारांनी आक्षेप घेतला असून त्यासंदर्भातील निर्णय काही दिवसांत होणार आहे.

# मुंबई महापौरपदाचा मुहूर्त ठरला!

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**मुंबई :** देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाचा सस्पेन्स आता लवकरच संपणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकाच्या देखरेखीखाली असलेल्या मुंबई महापालिकेत अखेर महापौर विराजमान होणार आहे. येत्या ११ फेब्रुवारी रोजी मुंबईचा नवा महापौर आणि उपमहापौर निवडला जाणार आहे. या निवडीसाठी पालिकेचे ऐतिहासिक महापौर दालन आता पूर्णपणे सज्ज झाले आहे.

मुंबई महापालिकेतील महापौर निवडीसाठीच्या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# वरुड परिक्षेत्रात वाघाचा मृत्यू

**अमरावती :** अमरावती वनविभागांतर्गत येणाऱ्या वरुड वनपरिक्षेत्रात एक वाघ मृत अवस्थेत आढळल्याची घटना समोर आली आहे. ही घटना वरुडमधील वाई वर्तुळ, पंढरी बीट येथील खंड क्रमांक १०१० मध्ये घडली असून, याबाबतची माहिती प्राप्त झाली आहे.वाघाच्या मृत्यूची माहिती मिळताच वरुड येथील पशुधन अधिकारी यांना तातडीने घटनास्थळी पाचारण करण्यात आले. प्राथमिक तपासणीनुसार, या वाघाचा मृत्यू साधारणतः १५ दिवसांपूर्वी झाला असावा असा अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. मृत वाघाचे शवविच्छेदन 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण'च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आले. त्यानंतर, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळीच वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या कार्यवाही दरम्यान वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी, पशुवैद्यकीय अधिकारी, डॉग स्कॉड, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मानद वन्यजीव रक्षक उपस्थित होते.

# निवडणूक खर्चाचा हिशेब न सादर करणाऱ्या 100 हून अधिक उमेदवारांना नोटीस



## आयोगाकडून कडक कारवाईचा इशारा

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्यात पार पडलेल्या निवडणुकांनंतर निवडणूक खर्चाचा तपशील वेळेत सादर न करणाऱ्या १०० हून अधिक उमेदवारांवर राज्य निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेतली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संबंधित उमेदवारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पुढील कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त राखण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाचा संपूर्ण तपशील ठराविक मुदतीत सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे. प्रचार, सभा, जाहिरातबाजी, वाहन खर्च, बॅनर, पोस्टर आदी सर्व खर्चाचा तपशील आयोगाकडे सादर करणे आवश्यक असते. मात्र, अनेक उमेदवारांनी हा अहवाल अद्याप सादर न केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने अशा उमेदवारांना नोटीस पाठवून तात्काळ खुलासा करण्यास सांगितले आहे. नोटीसीत नमूद केलेल्या मुदतीत खर्चाचा हिशेब सादर न केल्यास संबंधित उमेदवारांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये निवडणूक लढविण्यावर बंदी, दंडात्मक कारवाई किंवा अन्य कठोर निर्णयांचा समावेश होऊ शकतो.

निवडणुकीदरम्यान होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि काळ्या पैशाचा वापर रोखणे हा आयोगाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे नियमांचे काटेकोर पालन करणे प्रत्येक उमेदवाराचे कर्तव्य असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आयोगाच्या या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, उर्वरित उमेदवारांनीही तातडीने आपला निवडणूक खर्चाचा अहवाल सादर करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

# ३९ कोटी थकीत वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणचा अल्टीमेटम

## २४ तासासाठी थकबाकीदार शासकीय कार्यालयांचा वीज पुरवठा होणार खंडित




प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती:** वारंवार सूचना, स्मरणपत्रे, पत्यक्ष पाठपुरावा, नोंदणीकृत मोबाईलवर संदेशासोबत, यापूर्वी २२ जानेवारीला ४ तासासाठी टोकन डिस्कनेक्शन करूनही वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या परिमंडळातील १६ हजार ९८१ शासकीय कार्यालयांचा वीज पुरवठा येत्या १२ तारीखेला तब्बल २४ तासासाठी खंडित करण्यात येणार आहे.

वीजबिल भरण्याची बाब ही केवळ आर्थीक नसून वीजबिलाची वसूली हे महावितरणचे एकमेव आर्थीक स्त्रोत आहे. त्यामुळे महावितरणच्या या कारवाईनंतरही वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या शासकीय कार्यालयांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट

### २४ तास वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई

कोट्यावधीची थकबाकी असल्याने परिमंडळातील शासकीय व सार्वजनिक सेवा देणाऱ्या कार्यालयांविरूध्द महावितरणने कठोर भुमिका घेतली असून वीजबिल भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय कार्यालयांचे येत्या १२ तारखेला तब्बल २४ तासासाठी वीज पुरवठा खंडित केला जाणार आहे. परिमंडळाअंतर्गत थकबाकीदार १६ हजार ९८१ शासकीय कार्यालयामध्ये अमरावती जिल्ह्यातील ८ हजार १९१ कार्यालयाकडे १३२ कोटी २८ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील ८ हजार ७९० कार्यालयांकडे ३०६ कोटी ५२ लाख रूपये वीजबिलाचे थकीत आहे.

### शासकीय थकबाकीमुळे कर्मचाऱ्यांवर ताण

कर्मचाऱ्यांना थकीत वीजबिलाच्या वसूलीबाबत विचारणा होते किंबहुना त्यांना वसूलीसाठी जबाबदारही धरल्या जाते. त्यामुळे शासकीय कार्यालयांकडील वाढती थकबाकी महावितरणसाठी अडचण ठरत असून वसुलीबाबत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत आहे. वारंवार पत्रव्यवहार, स्मरणपत्रे व प्रत्यक्ष संपर्क करूनही अनेक कार्यालये वीजबिल भरण्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

### ५ हजार ४२७ कार्यालयांनी भरले नाही चालू आर्थीक वर्षात एकदाही वीजबिल

महावितरणकडून वारंवार पाठपुरावा करूनही परिमंडळातील शासकीय व सार्वजनिक सेवा आणि पाणीपुरवठा योजना अश्या ५ हजार ४२७ कार्यालयांनी एप्रिल २०२५ नंतर एकदाही बिल भरले नसल्याने त्यांच्याकडे १११ कोटी ५२ लाख रूपयांची थकबाकी झाली आहे. यात अमरावती जिल्ह्यातील १ हजार ८९६ कार्यालये असून त्यांच्याकडे ५६ कोटी ३२ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील ३ हजार ५३१ कार्यालयाकडे ५५ कोटी २० लाख रूपयाचे वीजबिले थकीत आहे.

# पत्रकारांसाठी गुरूवारी विशेष मोफत आरोग्य शिबिर !

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती:** पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी अमरावती जिल्हा पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिबिर पूर्णतः मोफत असणार आहे.

या शिबिरात सहभागी होणाऱ्यांना विविध तपासण्यांची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे. आरोग्यविषयक चाचण्यांमध्ये संपूर्ण रक्त तपासणीसाठी लिपीड टेस्ट, फुल बॉडी चेकअप, नेत्र तपासणी आणि दंत चिकित्सा यांचा समावेश आहे. याठिकाणी केवळ तपासणीच नाही, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्याबाबत मार्गदर्शनही केले जाणार आहे. यासोबतच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिबिरात 'आयुष्मान कार्ड' काढण्याची विशेष सोय करण्यात आली आहे. यासाठी पत्रकारांनी आपले रेशन कार्ड, आधार कार्ड आणि आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील पत्रकारांनी आपल्या कुटुंबासह याचा लाभ घ्यावा, तसेच अधिक माहितीसाठी ९०२८६५५५५९, ९८२२४९६९७२ किंवा ९८८११०२०८० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# शुक्रवारी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती:** स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नुकतेच यश संपादन केलेले दोन अधिकारी विद्यार्थ्यांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. २०२२ बॅचचे भारतीय वन सेवेत निवड झालेले प्रांजल चोपडे आणि २०२४ बॅचचे भारतीय पोलिस सेवेत निवड झालेले सागर भामरे मार्गदर्शन करणार आहेत.

# निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधा देणार -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती, :** निम्न पेढी प्रकल्पात पाच गावांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. या मान्सून हंगामात प्रकल्पात पाणी साठविण्यास सुरूवात होणार आहे. त्यामुळे या गावातील स्थलांतरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित करण्यात येणाऱ्या ठिकाणी सर्व सुविधा देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.



निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसनाबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास यांच्यासह बाधित पाचही गावांचे सरपंच आणि सिंचन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या प्राधान्यक्रमातील निम्न पेढी प्रकल्पात हातुर्णा, गोपगव्हाण, कुंड खुर्द, अळणगाव, कुंड सर्जापूर ही पाच गावे बाधित होणार आहे. यासाठी या गावातील रहिवाशांचे स्थलांतर करण्यावर भर देण्यात येणार आहे. सध्यास्थितीमध्ये अळणगाव येथे ७९ आणि कुंड सर्जापूर येथे ७२ नागरीक वास्तव्यास आहेत. त्यामुळे या नागरिकांच्या स्थलांतरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. पुनर्वसित गावात सहमती देऊन स्थलांतरीत झालेल्यांना प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत गावातील नागरिकांना स्थलांतरणासाठी भत्ता, घरकुल मंजूर करण्यात आले आहे. पुनर्वसित गावात नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

येत्या पावसाळ्यात प्रकल्पामध्ये पाणी साठणार असल्याने जुन्या गावातील नागरिक बाधित होणार आहे. यामुळे बाधित झाल्यानंतर त्यांचा बचाव करावा लागू नये, यासाठी पूर्व तयारी म्हणून आतापासून त्यांच्या स्थलांतरणासाठी प्रयत्न करावा. हातुर्णा येथे अंगणवाडीचे काम सुरू करण्यात आले आहे. गोपगव्हाण येथील पाणी पुरवठ्याची विजेची व्यवस्था सुरळीत राहावी, यासासाठी प्रयत्न करावेत. अळणगाव येथील स्मशानभूमीवरील अतिक्रमण काढण्यात यावे. कुंड सर्जापूर प्रार्थनास्थळांसाठी जागा उपलब्ध

# दहावी, बारावी परीक्षांसाठी 'कॉपीमुक्त अभियान'

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती:** दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हास्तरीय दक्षता समितीची सभा पार पडली. या सभेत या परीक्षा निकोप आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने दहावी आणि बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुघल, योजना शिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे आदी उपस्थित होते. दहावी आणि बारावीच्या परीक्षा ह्या दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आल्या आहेत. दहावीच्या परीक्षेला ३८,५३१ विद्यार्थी १८७ केंद्रांवरून परीक्षा देणार आहेत. बारावीसाठी ३५,९३४ विद्यार्थी १३७ केंद्रांवरून परीक्षा देतील. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण २२ केंद्रे स्थापित करण्यात आले आहे.जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात पोलीस अधिनियम ३७ (१) (३) लागू करण्यात आला आहे. केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स दुकाने परीक्षा कालावधीत बंद राहतील. सर्व केंद्रांवर हत्यारी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. मंडळाने जाहीर केलेल्या 'उपद्रवी' केंद्रांवर विशेष प्रभावी यंत्रणा राबविली जाईल.परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वीज वितरण कंपनीला विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विद्यार्थ्यांनी केंद्रावर वेळेत पोहोचावे यासाठी परिवहन विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# ग्रामसेवकांसाठी 'जेंडर इक्वॅलिटी' प्रशिक्षण

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती :** महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे 'जेंडर ट्रान्सफॉर्मेटिव्ह मेकॅनिझम' प्रकल्पांतर्गत ग्रामसेवकांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण पार पडले. 'जेंडर सेन्सिटायझेशन' आणि 'जेंडर बजेटिंग' यावर हे प्रशिक्षण पार पडले.

# गुरूवारी पेंशन अदालतीचे आयोजन

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अमरावती :** नागपूर येथील महालेखापाल कार्यालय आणि कोषागार कार्यालयातर्फे पेंशन समाधान मोहिमेंतर्गत पेंशन अदालतीचे आयोजन गुरूवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात करण्यात आले आहे.

यामध्ये निवृत्ती वेतनविषयक प्रणालीमध्ये निवृत्ती वेतन प्रस्ताव तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच दुपारी २.३० वाजता सर्व निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना त्यांचे निवृत्ती वेतनाबाबत अडचणी असल्यास महालेखापाल यांचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, तसेच निवृत्ती वेतनधारक तथा कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी उपस्थित राहून अडचणीचे निराकरण करावे, असे आवाहन कोषागार कार्यालयाचे सहायक संचालक अमोल इखे यांनी केले आहे.



# विज्ञान आणि अध्यात्म ; सांगड घालणं अवघडच ...

कित्येक वर्षे अनेक लोकांचे ऐकून झाल्यावर आणि बरीचशी पुस्तके वाचून झाल्यानंतर, बऱ्याच दिवसांपासून मनात एक विषय घोळत आहे. या अनेक लोकांमध्ये कितीतरी विद्वान लेखक, खेळाडू, शास्त्रज्ञ, राजकारणी, अध्यात्मिक गुरु, व्यावसायिक आणि कलाकार आहेत की जे या विषयाच्या बाजूने आणि विषयाच्या विरुद्ध सुद्धा आहेत. ही मंडळी आपापल्या क्षेत्रातील मातब्बर मंडळी आहेत त्यामुळे यांच्या अनुभवाविषयी काही संशय घ्यायला जागाच नाही.

सर्वच क्षेत्रातील यशस्वी लोकं या विषयावर आपला अनुभव सांगतांना एवढ्या ठामपणे सांगतांना दिसतात किंवा आपले मत एवढ्या ठामपणे मांडतात कि सामान्य लोकांना काही कळेनासे होऊन जाते. 'ईश्वराचे अस्तित्व', 'आपल्याच महाराजांमध्ये असलेली असीम शक्ती', 'आपलेच काय ते बरोबर' अश्या विषयांवर दोन्ही बाजू मांडणारया मंडळींचे यश हे निर्विवाद आहे. कित्येक यशस्वी मंडळी ईश्वराचे किंवा 'आपल्याच गुरूंचे अस्तित्व काय ते खरे आणि बाकी सगळे खोटे' असे अगदी ठामपणे प्रतिपादित करतात. अर्थातच या यशस्वी व्यक्ती वेगवेगळ्या स्वरुपात आपण ईश्वरी किंवा तत्सम शक्तींचे अस्तित्व स्वीकारतो असेही मान्य करतात.

याच्या अगदी विरुद्ध अनेक यशस्वी मंडळी ईश्वराचे किंवा तत्सम शक्तींचे अस्तित्व सर्वतोपरी अमान्य करतात. ते आपली बाजू हिरीरीने मांडतांना समाजातील अंधश्रद्धा आणि बुवाबाजी आणि श्रद्धा या घटकांवर टीका करतात आणि ईश्वर आणि तत्सम शक्ती ही संकल्पना सर्वस्वी काल्पनिक असल्याचे ठासून सांगतात. 'ईश्वर आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहिला आहे अशी एक व्यक्ती शोधून आणा' हे म्हणताना विज्ञानवादी हेटळणी करतांना दिसतात. अश्यावेळी ह्या व्यक्ती सगळे काही विज्ञानावर अवलंबून आहे आणि ज्या गोष्टी सिद्ध करता येत नाहीत त्या गोष्टी काल्पनिक आहेत असे स्पष्टपणे सांगतात.

विज्ञान आणि अध्यात्म अश्या दोन्ही घटकांशी ज्यांचा परीचय आहे त्यांना काय खरे आणि काय खोटे हे कळतच नाही. विज्ञानाला सर्वश्रेष्ठ समजले तर अश्या कितीतरी बाबींची साखळीच डोळ्यासमोर येते कि ज्याची उत्तरे विज्ञानापाशी नाही आहेत. कितीतरी महत्वपूर्ण घटना केवळ अनुमान म्हणूनच विज्ञानाने समोर मांडल्या आहेत आणि त्या वैज्ञानिक तथ्य म्हणून मान्य केल्या जाव्यात अशी धारणा आहे. पृथ्वीची निर्मिती कशी झाली, किती लाख किंवा कोटी वर्षांपूर्वी झाली, इतर ग्रहांची निर्मिती कशी झाली, मानवाची निर्मिती कशी झाली (डार्विनच्या सिद्धांताला कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही. त्यातल्या त्यात संकल्पनेच्या जवळ जाणारे केवळ अनुमान.), स्त्री आणि पुरुषांची प्रजाती भिन्न-भिन्न शारीरिक बनावट घेवून कशी काय निर्माण झाली....अश्यासारखे कितीतरी महत्वपूर्ण प्रश्न सध्यातरी अनुत्तरीत आहेत किंवा त्याला कोणताही सैद्धांतिक पुरावा विज्ञानाला देता येत नाही.

रामायण, महाभारत, देव-देवता, राक्षस हे सर्व कपोलकल्पित असल्याचे आमचे विज्ञानवीर सांगतात. परंतु त्याचबरोबर वर विचारलेल्या प्रश्नांची पुराव्यासकट कोणतीही उत्तरे त्यांच्यापाशी नाहीत. जो माणूस अस्तित्वात येऊन आता हजारो वर्षे झालेली आहेत, त्याचा तरी संपूर्ण अभ्यास विज्ञानाने केला आहे का, असा प्रश्न सुद्धा अनुत्तरीत आहे. आपल्याला स्वप्ने का पडतात, स्वप्नांची विचित्रता हा काय प्रकार आहे, मानवामध्ये असलेल्या अनेक बाबी जसे स्मरणशक्ती, बोलण्याची शक्ती ह्यांचे मूळ कुठे आहे, असे अनेक प्रश्न पुराव्याने सिध्द अजून तरी झालेले नाहीत. मानवी मेंदुविषयी हजारो वर्षांनंतरही विज्ञानवीरांचे ज्ञान अगदीच तोकडे आहे हे निष्णात न्युरोलोजीस्ट मान्य करतात. या ठिकाणी केवळ दोन-पाच असे प्रश्न तुमच्या समोर ठेवले आहेत की ज्यांची उत्तरे अजूनही कोणापाशीच नाहीत. असे अजूनही कितीतरी निसर्गाशी आणि मानवाशी संबंधित प्रश्न आहेत कि ज्या विषयी विज्ञान मौन आहे.



नितीन बक्षी
अकोला,
९३७०२६०४९१

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अकोला आकाशवाणीवर गजानन महाराज कथाकथनाचा भक्तिपूर्ण कार्यक्रम

**अकोला :** संत श्री गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही अकोला आकाशवाणी केंद्रावर गजानन महाराज कथाकथनाचा भक्तिरसाने ओथंबलेला कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दि. ५ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पाच दिवसांत पाच भागांमध्ये प्रसारित होणार आहे. दररोज सकाळी ७.४० ते ७.५५ या वेळेत होणाऱ्या या प्रसारणात संत श्री गजानन महाराज यांच्या संपूर्ण जीवनकथेचा सारगर्भित आढावा श्रोत्यांना अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वर्गीय दिवाकरजी आगरकर यांच्या भारदस्त व भावस्पर्शी आवाजातील कथाकथन, जे भक्तांच्या मनात भक्तीभाव जागृत करणारे आहे. या पावन कार्यक्रमामुळे घरबसल्या संत गजानन महाराजांच्या चरित्राचे श्रवण करण्याची सुवर्णसंधी श्रोत्यांना मिळणार असून, ह्या कार्यक्रमाचे प्रायोजक एस. एस. खरोटे सुवर्णकार असुन सर्व गजानन भक्तांनी व उसळत्यांनी या कार्यक्रमाचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत सिकलसेल जनजागृती

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला :** अरूणोदय सिकलसेल अभियानांतर्गत शून्य ते ४० वर्षे वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात येत असून, १०० टक्के तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानिमित्त शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यां मार्फत सिकलसेल जनजागृती रॅली काढण्यात आली. जिल्ह्यात जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या मार्गदर्शनात अरुणोदय सिकलसेल विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. शासकीय अधिपरिचारिका महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींतर्फे परिसरात रॅली काढण्यात आली.

## पुंडा गाव बनले प्रभारी कर्मचाऱ्यांचे माहेरघर पोलिस पाटील, कोतवाल पदच रिक्त

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**कुटासाः** तालुक्यातील पुंडा येथे प्रभारी कर्मचारी असल्यामुळे नागरिकांची कामे खोळंबली आहेत गावातील ग्रामसेवक यांची बदली जवळपास ५ ते ६ महिन्यापूर्वी झाली तेव्हा पासून ग्रामसेवक हे देखील प्रभारी आहेत त्यांच्या कडे तीन गावांचा प्रभार असल्यामुळे ते फक्त ग्राम सभेसाठीच गावात दिसतात त्यामुळे गावातील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. गावात नियमित ग्रामसेवक द्यावा ही मागणी गावकरी करतांना दिसून येत आहेत तसाच काहीसा प्रकार कोतवाल पदा बाबत देखील आहे खूप वर्षांनंतर पुंडा येथील कोतवाल पद भरल्या गेले होते पण सदर कोतवालाचे अकाली निधनाने ही जागा देखील जवळपास चौदा महिन्यांपासून रिक्त आहे कोतवाल हा महाराष्ट्र महसूल विभागातील गावाच्या पातळीवरील एक महत्त्वाचा चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहे, ज्याची नेमणूक तहसीलदार करतात व ते तलाठ्याच्या मार्गदर्शनाखाली कामे करतात, गावातील जमिनीचे रेकॉर्ड सांभाळणे, महसूल गोळा करणे आणि सरकारी टपाल पोहोचवणे ही त्यांची प्रमुख कामे आहेत .हे पद स्थानिक प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावते त्यामुळे गावातील कामाचा मोठ्या प्रमाणात ताण हा तलाठी यांच्यावर आला आहे. तलाठी देखील सुट्टीवर असल्यामुळे तलाठी देखील गावात प्रभारी आहेत आणि कृषी सहायक यांचे पुंडा हे मुख्यालय आहे पण त्यांच्या कडे देखील बारा गावे असल्यामुळे त्यांना देखील प्रभारी म्हणणे वावगे ठरणार नाही प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पुंड्याची देखील सारखीच परिस्थिती आहे तिथे आरोग्य सेविका देखील प्रभारी आहे त्या विभागातील कर्मचारी देखील लसीकरणाचा दिवशी हजर दिसतात अशा प्रभारी कर्मचाऱ्यांन मुळे नागरिकांची कामे अक्षरश थांबली आहेत लोकांना प्रचंड मनस्तापाचा सामना करावा लागता आहे.

गावातील पोलिस पाटील हे पद जवळपास सहा वर्षापासून रिक्त आहे महाराष्ट्र राज्याच्याग्राम प्रशासनातील एक महत्त्वपूर्ण दुवा म्हणजे 'पोलीस पाटील'.महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७नुसार गावातील कायदा आणि सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची माहिती पोलिसांना देणे आणि गाव शांतता राखण्याचे काम पोलीस पाटील करतात त्यांची मुख्य भूमिका पोलीस आणि गावकरी यांच्यातील महत्त्वाचा दुवा. गावातील बेवारस मालमत्ता, गुन्हे आणि संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे ही असते पण गावातील हे पद देखील प्रभारी आहे.

◆ शासनाने आमचे गाव वाऱ्यांवर सोडल्यासारखे दिसून येत आहे सगळे कर्मचारी प्रभारी असल्याने कर्मचारी शोधण्यासाठी गावातील नागरिकांना वणवण फिरावे लागत आहे याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे

**सुधाकर पाटील पुंडकर**
उपसरपंच ग्रामपंचायत पुंडा

◆ पोलिस पाटील कोतवाल ही पदे रिक्त आहेत त्यात भरीत भर म्हणजे ग्रामसेवक हे देखील प्रभारी आहेत मग एवढे मोठे गाव असून सगळे कर्मचारी जर प्रभारी असतील तर आमचे गाव काय शासनाने वाळीत टाकले का ?

**नरेश पाटील पुंडकर**
ग्रामपंचायत सदस्य पुंडा

## युवकांसाठी क्रिएटिंग फ्युचर्स सलग 15 आठवडे प्रशिक्षण

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**अकोट :** अकोट शहरातील प्रशिक्षण संस्था सफल फाउंडेशन व सामाजिक संस्था रोटरी व्हिजन अकोटच्या अकोट शहरातील युवकांसाठी सलग १५ आठवडे क्रिटिंग फ्युचर्स ह्या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण कार्यक्रम वसुंधरा ज्ञानपीठ अकोट ऑफिस कोचिंग क्लासेस अकोट च्या विद्यार्थ्यांकरीता दर शनिवार आणि रविवारला पूर्ण १५ आठवडे ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे युवकांमध्ये सकारात्मक बदल व्हावा युवकांनी त्यांचे जीवनातील ध्येय ठरउन गाठावे, विपरीत परिस्थिती आल्यास त्यावर कशी मात करता येईल याचे सखोल मार्गदर्शन, भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शालेय विद्यार्थ्या सोबत विविध विषयांवर चर्चात्मक पद्धतीने हे ह्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सेमिनार्स मध्ये गेम, पावर ऑफ डिक्लेरेशन ,ध्येय निश्चिती, पॉवर सोअर्स ,इंटिग्रिटी, अपसेट ,मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार? अश्या विविध १५ विषयांचा समावेश आहे.या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडून त्यांनी जीवनातील ध्येय निश्चिती करावी. यावर हे सर्व सेमिनार त्यांना नेहमी मार्ग दर्शवित राहतील.या कार्यक्रमासाठी मुख्य शिरीष वंजारा ,अरुण हिंगणकर,नंदकिशोर शेगोकार ,वैभव अस्वार ,मुरलीधर इंगळे ,अरुण सांगळोदकर तर प्रकल्प प्रमुख संदीप बोबडे, प्रकाश बिहाडे काम पाहत आहेत अध्यक्ष आनंद भोरे, अतुल मालानी, सचिन मारू, प्रवीण बनसोड यांचे सहकार्य लाभले.

## आश्रम शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन

**हातरूणः** आश्रम शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. उदघाटन विद्यार्थ्यांची आजी लक्ष्मीबाई दतूजी इंगळे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.कार्यक्रमाला संस्था उपाध्यक्ष गजानन साळवे,मुख्याध्यापक रविकुमार खेतकर, शालिकराम गायकवाड, रमेश डोंगरे, प्रवीण डोंगरे, विठ्ठल कुरवाळे, अजाबराव डोंगरे, राजपाल डोंगरे, लखन डोंगरे, वसंता गोरले, श्रीहरी खोंड यांचे सह महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. परीक्षक म्हणून जिल्हा परिषद शाळा शिंगोली येथील मुख्याध्यापिका रुजिता खेतकर यांनी काम पाहिले.आनंद मेळाव्या मधे उत्कृष्ट पदार्थचे पारितोषिक इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी समृद्धी वानखडे हिने पटकाविले.उत्कृष्ट स्टॉल डेकोरेशनचे पारितोषिक इयत्ता पहिलीतील विद्यार्थीनी आरुषी कराळे तर बेस्ट सेलर म्हणून इयत्ता चौथी तील विद्यार्थिनी आदिती ढोले आणि जास्तीत जास्त उपस्थिती बेस्ट फॅमिली अवार्ड इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी श्रेया डोंगरे हिच्या परिवाराने पटकावला आहे.कार्यक्रम च्या यशस्विते साठी आश्रम शाळेतील शिक्षक दिलीप डोंगरे,योगेश वडतकर,मुकुल तिवारी,पवन गवई,अतुल कलोरे शिक्षकेत्तर कर्मचारी संजय सागळे,संतोष सोळंके,वंदना टाले विद्यार्थी व पालकांनी परिश्रम घेतले.

## स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**पातूर :** स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीस सर्वपक्षीय शोकसभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मंगळवारी सायंकाळी येथील विश्रामगृहात झालेल्या सभेत विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, स्व. दादांचे चाहते उपस्थित होते.

त्यांच्या आकस्मिक निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असल्याची भावना सभास्थळी सर्वत्र जाणवत होती.यावेळी माजी जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे, माजी नगराध्यक्ष हाजी सै. बुऱ्हाण, उपनगराध्यक्ष राजू उगले, सचिन ढोणे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सतीश सरोदे, रामा अमानकर, विजय सिंह गहलोत, नंदकिशोर राऊत, ठाकूर शिवकुमार बायस, विजय राऊत, राजेश महल्ले, सुधीर सुरवाडे, संदीप तायडे, गणेश गाडगे, छगन कराळे, शेख अन्सार, प्रदीप काळपांडे, सचिन बारोकार, राजाराम देवकर, संजय गोतरकर हाफिजउल्ला खान, विठ्ठल लोथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी फरहान अमीन (प्रदेश सचिव, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस), कामरूझझ्मा खान (शहर अध्यक्ष) आणि पत्रकार नातीक शेख यांनी परिश्रम घेतले.

## सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी महादेवराव इंगळे यांची निवड

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी




**हिवरखेड :** जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक तथा इतर संवर्गातील शिक्षकांची १ फेब्रुवारी रोजी सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी महादेवराव इंगळे होते तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष त्रंबक सावरकर, गावंडे, चोटीया तसेच वाघमारे यांची उपस्थिती होती.

सभेमध्ये पंचायत समिती अंतर्गत सेवा निवृत्तीची प्रलंबित कामे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कर्ज प्रकरणे त्रेयमासिक सभा घेणे अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आली तसेच सदर सभेत सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची सर्वानुमते कार्यकारणी गठीत करण्यात आली. यामध्ये संघटनेचे अध्यक्षपदी महादेव इंगळे यांची निवड करण्यात आली. सभेला त्रंबक सावरकर यांनी मार्गदर्शन केले. सदर सभेमध्ये रामेश्वर भोंगाळे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सेवानिवृत्त मुख्याध्यापक भारत तायडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रकाश ढोकणे यांनी केले.

## अकोट–अकोला रोडवर भीषण अपघात, वाहतूक विस्कळीत

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**कुटासाः** तांदुळवाडी ते मुंडगाव फाटा दरम्यान मंगळवारी रात्री कार आणि मोटारसायकल यांच्यात भीषण धडक झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे परिसरात काही काळ एकच गोंधळ उडाला असून रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने मोटरसायकलचे मोठे नुकसान झाले, तर कारचेही पुढील भागाचे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वेग, निष्काळजी वाहनचालकपणा किंवा रस्त्याची परिस्थिती कारणीभूत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे दरम्यान, या मार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांकडून प्रशासनाने योग्य उपाययोजना कराव्यात, स्पीड ब्रेकर, सूचक फलक आणि पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## श्री संत रविदास महाराज यांची जयंती साजरी




प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**बाळापूरः** रविदास नगर लोटनापुर येथे संत रविदास महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी सर्वपक्षीय कार्यकर्ते व चर्मकार समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमांचे अध्यक्ष नगर सेवक संजय उमाळे, प्रमुख पाहुणे जम्मू सेठ, नगर परिषद उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे ,बाळापुर चर्मकार शहर अध्यक्ष प्रकाश खनसरे,कार्याध्यक्ष विशाल हसुलकर आनंद बनचरे,गुलाब उमाळे,गोकुल खजूरे,अजय पदमने,निरंजन काळसकार,बंटी महारज,गणेश भिसे,संजय हसुलकर, अक्षय हसुलकर ,भोनाजी ठोंम्बरे,सलमान भाई,मोहन धरमठोक, अशोक राणे,बंटी किलेकर,चेतन खनसरे,श्रीकांत ठोंम्बरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जयराम सोनोने यांनी केले व आभार प्रदर्शन विशाल हसुलकर यानी केले.

## ग्रामीण भागातील विद्यार्थीही तितकेच टॅलेंटेड - ठाणेदार अजित जाधव

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**मूर्तिजापूरः** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड गुणवत्ता असून टॅलेंटच्या बाबतीत ते शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा कमी नाहीत, असे प्रतिपादन ठाणेदार अजित जाधव यांनी केले.

दारूल उलुम संस्था व इमाम वलीउल्लाह पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजद्वारा आयोजित बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बोर्ड प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, योग्य मार्गदर्शन, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही कोणतेही शिखर गाठू शकतात. शिक्षण हे समाजबदलाचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांनी शिस्त, नैतिकता आणि कर्तव्यभावनेतून पुढे जावे, असे आवाहनही त्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती रोशन शाह कासमी यांनी ठाणेदार अजित जाधव यांचे शाल व पुष्पमाला स्वागत केले तसेच ठाणेदार अजित जाधव यांनी संपूर्ण संस्थेची पाहणी करून कौतुक केले.

## उन्हाळ्याची चाहुल लागताच ते गुंतले कलाकुसरीत



प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**हिवरखेडः** उन्हाळ्याची चाहूल लागताच सावलीचा आसरा घेत ताट्या पाट्या बनवणारे कलाकार गुंतलेले दिसतात.

हिवरखेड येथील अण्णाभाऊ साठे सभागृहाच्या परिसरात असलेल्या झाडाचा आसरा घेत आपली हातावरील कलाकारी करून आपल्या पोटाची खळगी भरतात. उन्हाळ्यात ताट्यांना मागणी असते. ही बाब लक्षात घेऊन विविध आकाराच्या ताट्या ते तयार करतात. कुटुंबातील सदस्य यामध्ये सहभागी झालेले दिसतात.

## संत तुकाराम महाराजांनीच शेतकऱ्यांची पहिली कर्जमाफी केली : शिवलीलाताई पाटील

**कुणबी युवक संघटनेचा पुढाकार**

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी




**तेल्हारा :** येथे संत तुकाराम महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संत तुकाराम महाराज चौकात आयोजित कीर्तनात ह.भ.प. शिवलीलाताई पाटील यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनचरित्रावर सखोल विवेचन केले. 'सर्वप्रथम शेतकऱ्यांची कर्जमाफी संत तुकाराम महाराजांनीच केली,' असे ठाम प्रतिपादन त्यांनी आपल्या कीर्तनातून केले.

संत तुकाराम महाराजांनी मानवी मूल्ये, समता, करुणा आणि सामाजिक न्याय यांचा संदेश दिला. शेतकरी, कष्टकरी आणि वंचितांच्या दुःखावर फुंकर घालत त्यांनी अन्यायाविरोधात उभे राहण्याची प्रेरणा दिली, असे सांगत शिवलीलाताई पाटील यांनी अभंगांच्या माध्यमातून तुकाराम महाराजांचा समाजसुधारक दृष्टिकोन उलगडून दाखवला. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना माणुसकीची आणि न्यायाची वाट दाखवणारा तुकाराम महाराजांचा वारसा आजही मार्गदर्शक आहे, असे त्यांनी नमूद केले.

संत तुकाराम महाराज जयंती उत्सव निमित्त संत तुकाराम महाराज चौकामध्ये सकाळी स्वच्छता अभियान करण्यात आले व ११ ला आरती झाल्यानंतर बारा वाजता रक्तदान शिबिर घेण्यात आले .सायंकाळी ६ वाजता माऊली संगीत क्लासच्या वतीने भारतीय सध्याचा कार्यक्रम घेण्यात आला रात्री साडेसात वाजता हरिभक्त परायण शिवलीलाताई पाटील यांच्या हरिकीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला या कीर्तनामध्ये टाडकरी मंडळीचे मोलाचे सहकार्य लाभले तत्पूर्वी तेल्हारा नगरपालिकेच्या अध्यक्षा व सर्व पालिका सदस्यांचा कुणबी युवक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला ह भ प गाडेकर महाराज न.प. मुख्याधिकारी सतीश गावंडे व पोलीस उपनिरीक्षक निलेश ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्तावित उज्वल दबळघाव व टिकार मॅडम यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कुणबी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष श्याम गावंडे शहर अध्यक्ष वैभव तायडे महिला संघटना तालुका अध्यक्ष सुमनताई कोठे शहराध्यक्ष आरतीताई गायकवाड संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले कार्यक्रमास कुणबी युवक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## शहापूर रूपागड येथे शंकर पटाचे भव्य आयोजन

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**अकोट :** शहापूर रूपागड गावाचे ग्राम दैवत मोती मातेच्या कृपेने गावकरी व शंकर पट मंडळाच्या पुढाकाराने शंकर पटाचे आयोजन केले आहे. समाप्ती बुधवारी होईल. मंगळवार पासून सुरू झालेल्या शंकर पटाला चांगला प्रतिसाद मिळाला.

शंकर पटाचे स्थळ राजेश पवार यांच्या शेतात आहे. प्रथम बक्षीस राजू तराळे २१००० रु. यांच्यातर्फे, द्वितीय बक्षीस शंकर पट मंडळ शहापूर ११००० रु. व राजेश भालतिलक बोर्डी उपसरपंच ५००० रु., तृतीय बक्षीस बंटी पांडे पिंप्रि खुर्द ७००० रु. व मंगेश चिखले आकोट ३१००रु., चतुर्थ बक्षीस दीपिकाताई मंगळे सरपंच बेलुरा ७००० रु., पाचवे बक्षीस गजानन शिंगणे सहा. कृषी.अधिकारी ५००० रु., सहावे राजेंद्र पवार शहानुर ४००० रु., सातवे रमेश भारसाकळे शहापूर २००० रु. व भास्कर मानकर बोर्डी २१०० रु., आठवे विनायक सुरत्ने ३००० रु,. नववे राहुल बोंडे सरस्वती ?ग्रो एजन्सी उमरा ५००० रु., दहावे न्यू एकलव्य क्रीडा मंडळ शहापूर २१०० रु. व प्रदीप पवार शहानुर ७५०रू., अकरावे देवा भारसाकळे २१००रु., बारावे पांडुरंग खवले उमरा ५०००रु., तेरावे ठाकरे मेजर बीट अमोना २१००रु., चौदावे मधुकर पवार शहानुर १०००रु. व तूरावजी सुरत्ने शहापूर १०००रु. पंधरावे राम वरणकार जीतापूर माऊली २१००रु..कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार प्रकाश भारसाकळे, सरपंच सविताताई सुरत्ने, राजू तराळे, दिलीप बोचे, सुभाष सुरत्ने, राजूभाऊ भालतिलक, पांडुरंग खवले, प्रशांत मानकर, बंटी पांडे, विलास पवार पो. पाटील, रामदादा मंगळे बेलुरा, मंगेश चिखले, प्रकाश आतकड माजी जि. प. सदस्य, राजेश रावणकर, गजानन शिंगणे, उमेश पवार, गोपाल मोहोळ भाजपा ता. ग्रा. अध्यक्ष, शेषराव भास्कर तंटामुक्ती अध्यक्ष, हरीश टावरी शहर ता. अध्यक्ष, रामभाऊ भास्कर, राहुल बोंडे, राजेंद्र पवार, विनायक सुरत्ने, अंबादास सुरत्ने, शंकर पटाचे उद्घाटक राजीव पा. तराळे, दिलीप बोचे, राजेश भालतिलक, उमेश पवार, विलास पवार, सविताताई सुरत्ने यांच्या उपस्थितीमध्ये पार पडेल.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# 'भूमीअभिलेख'च्या दोन अधिकाऱ्यांना रंगेहाथ पकडले

## फेरफारसाठी घेतली ५ हजार रुपयांची लाच

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**दिग्रस :** सामान्य नागरिकांच्या कामासाठीच लाच मागणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांचा धंदा! दिग्रस येथील भूमी अभिलेख कार्यालयात मालमत्तेच्या फेरफार प्रकरणात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना उपअधीक्षक आणि भूमापक या दोन अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी), यवतमाळ यांनी मंगळवारी (३ फेब्रुवारी २०२६) रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे स्थानिक प्रशासनात खळबळ उडाली आहे. उपअधीक्षक सखाराम नरसिंग पवार (वय ४९), नझुल परिरक्षण भूमापक आशिष काशिनाथ शेलोकर (वय ४७), दोघेही भूमी अभिलेख



कार्यालय, दिग्रस अशी अटक केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहे. तक्रारदार महिलेच्या सासऱ्यांनी तिला आणि तिच्या पतीला बक्षीसपत्राद्वारे मालमत्ता दिली होती. या बक्षीसपत्रानुसार फेरफार करून घेण्यासाठी तक्रारदाराने आवश्यक कागदपत्रे आरोपी आशिष शेलोकर यांच्याकडे सादर केली. त्यांनी उपअधीक्षक पवार यांची भेट घेण्यास सांगितले. पवार यांनी कामासाठी ५ हजार रुपयांची लाच मागितली.

त्रस्त झालेल्या महिलेला एसीबीकडे तक्रार दाखल केली. विभागाने पडताळणी केल्यानंतर सापळा कारवाईचे नियोजन केले. सापळ्यादरम्यान आशिष शेलोकरने पंचासमक्ष तक्रारदाराकडून ५ हजार रुपये घेतले. त्यातील २,५०० रुपये स्वतःकडे ठेवून उरलेले २,५०० रुपये उपअधीक्षक सखाराम पवार यांना देताना दोघांनाही उपअधीक्षकांच्या कक्षातच रंगेहाथ पकडण्यात आले.

या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास एसीबीकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे आणि पोलीस उपअधिक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज ओरके, अर्जुन घनवट व त्यांच्या पथकाने केली.

एसीबीने आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने लाच मागितल्यास नागरिकांनी निर्भय होऊन यवतमाळ एसीबी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन केले.

## ऑटो पलटी: चिमुकली ठार

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी



**पुसद :** पुसद-उमरखेड मार्गावर मनूला येथे सटवाई यात्रेसाठी जात असताना मंगळवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात दीपाली अतुल सुरोशे (वय १०) या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला, तर तिची आई सपना सुरोशे गंभीर जखमी झाली आहे. शिवाजी वॉर्ड येथील सुरोशे कुटुंब मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास नवस फेडण्यासाठी मनूला (ता. उमरखेड) येथे सटवाई यात्रेला जात होते. ते एम.एच. २५ एन १३३५ या ऑटोने प्रवास करत होते. ऑटो मृत दीपालीचा काका सतीश बंडू सुरोशे (वय २२) चालवत होता. महावीर नगरजवळील एका वळणावर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे चालकाचे नियंत्रण सुटले व भरधाव ऑटो पलटी झाला. या अपघातात दीपालीच्या डोक्याला जबर मार लागल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर तिची आई सपना गंभीर जखमी झाली. जखमींना तात्काळ पुसद येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# मोटारसायकलसह पाण्याचे मोटारपंप चोरणारी टोळी गजाआड



१३ दुचाकी, ९ पंप जप्त; १२ गुन्ह्यांची उकल

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**पुसद :** नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील विविध भागांतून मोटारसायकल तसेच शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याचे मोटारपंप चोरी करणाऱ्या एका टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी पर्दाफाश केला आहे. या धडाकेबाज कारवाईत पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १३ मोटारसायकल आणि ९ पाण्याचे मोटारपंप असा एकूण ५ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे एकूण १२ चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.) यांनी अवैध धंदे, शस्त्र बाळगणे तसेच मोटारसायकल व शेती अवजार चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष निर्देश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी गोपनीय माहिती गोळा करून प्रभावी कारवाई केली.

दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी उमरखेड उपविभागात पेट्रोलिंग करताना सायंकाळी सुमारे चार वाजता मुखबिरामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली. अमोना धरणाजवळील रेस्ट हाऊस परिसरात शेतातील पाण्याचे मोटारपंप चोरी करणारे काही संशयित थांबले असल्याचे कळताच पोलिसांनी तत्काळ सापळा रचला. संशयितांना ताब्यात घेतले. अटक केलेल्या आरोपींमध्ये साजिद खान वाजिद खान (रा. जामा मस्जिद वार्ड, उमरखेड), शेख उमेर शेख मुजीब (रा. डॉ. जाकीर हुसेन वार्ड, उमरखेड), मोहम्मद रेहान मोहम्मद रफिक (रा. ताजपूरा, उमरखेड), श्रीकांत उर्फ शेरा बालाजी सूर्यवंशी (रा. माळसावरगाव, ता. हदगाव, जि. नांदेड) तसेच एक विधीसंघर्षातील बालक यांचा समावेश आहे.तपासात आरोपींनी उमरखेड पोलीस स्टेशन क्र. २५/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केल्याची कबुली दिली. चोरीचा मुद्देमाल नांदेड जिल्ह्यातील फरार आरोपीच्या मदतीने हदगाव (नांदेड) येथील भंगार व्यावसायिक शेख कादीर शेख ख्वॉजा याच्याकडे विकला जात असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींकडून जप्त केलेल्या १३ मोटारसायकल आणि एच.पी. कंपनीच्या जुने वापरलेले ९ पाण्याचे मोटारपंप यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून चोरलेले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानिक गुन्हे शाखा) व पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ (उमरखेड) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनि धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, पोउपनि रविंद्र शिरामे, पोहवा संतोष भोरगे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## गिट्टी क्रेशरवर चौकीदाराचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**उमरखेड :** तालुक्यातील चुरमुरा गावाजवळील गिट्टी क्रेशरवर रात्रपाळीमध्ये चौकीदारी करणाऱ्या एका व्यक्तीचा मृतदेह मंगळवारी सकाळी सुमारे 8 वाजताच्या सुमारास क्रेशर परिसरात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मृत व्यक्तीचे नाव नामदेव वसराम चव्हाण (55), रा. चुरमुरा असे आहे. त्यांचा भाऊ मनोज वसराम चव्हाण यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. नामदेव हे गिट्टी क्रेशरवर नुकतेच रात्रपाळी चौकीदार म्हणून काम करू लागले होते. नेहमीप्रमाणे सकाळी आठ वाजेपर्यंत घरी न परतल्याने नातेवाइकांनी शोध घेतला असता, क्रेशरजवळच त्यांचा मृतदेह पडलेला आढळला.

पाहणी केल्यावर मृतदेहाच्या डोक्यातून रक्त येत होते. डोक्यावर एक-दोन ठिकाणी मार लागल्याच्या किरकोळ जखमा दिसत होत्या. घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

वृत्त लिहिपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नव्हता. मृतदेहावर बुधवारी शवविच्छेदन होणार असून, त्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. या संशयास्पद घटनेचा तपास फौजदार योगेश जाधव, जमादार संदीप ठाकूर आणि शिपाई नुळे हे करीत आहेत.

मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मयताच्या नातेवाइकांनी केली आहे.

# दोन तरुणांना अटक; तलवारीसह मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी




**पांढरकवडा :** पांढरकवडा पोलिसांनी शहरात बेकायदेशीर शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे एका चारचाकी वाहनातून धारदार तलवार घेऊन जाणाऱ्या दोन तरुणांना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईत तलवार, वाहन आणि मोबाईल फोन असा एकूण ५ लाख ४६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहन क्रमांक MH32 AS 7407 मधून दोन तरुण धारदार तलवार घेऊन जात असल्याची खात्रीलायक माहिती ३ फेब्रुवारी रोजी मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला कारवाईचे आदेश दिले.

पथकाने सापळा रचून वाहनाची पंचांसमक्ष झडती घेतली. यावेळी कारमध्ये एक धारदार लोखंडी तलवार (किंमत १,५०० रुपये) सापडली. पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केला. पांढरी चारचाकी कार (अंदाजे किंमत ५ लाख रुपये) धारदार लोखंडी तलवार (किंमत १,५०० रुपये) दोन मोबाईल फोन (किंमत ४५,००० रुपये) या प्रकरणी शेख अजहरुद्दीन शेख हफिजोद्दीन (वय ३१, रा. पांढरकवडा), शाहरुख खान अयुब खान (वय ३१, रा. पांढरकवडा) या दोघांना अटक करण्यात आली.

पांढरकवडा पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक १५१/२०२६ नोंदवण्यात आला असून, शस्त्र अधिनियम कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

पथकात पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर, पोहेकॉ प्रमोद जुनूनकर, विलास जाधव, सचिन काकडे, संदीप मडावी आणि राज मुत्यलवार यांचा समावेश होता. शहरात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांची अशी कारवाई सुरू राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## १४ फेब्रुवारीला विशाल हिंदू संमेलन

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**यवतमाळ :** हिंदू बांधवांमध्ये एकता, अखंडता व समरसतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी तसेच हिंदू समाज व हिंदू राष्ट्र सक्षम करण्याच्या उद्देशाने सकल हिंदू समाजाच्या वतीने पुष्पकुंज वस्ती, यवतमाळ येथे विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन १४ फेब्रुवारीला हनुमान मंदिर, पुष्पकुंज सोसायटी, वडगाव रोड येथे होणार आहे.

संमेलनाच्या तयारीचा भाग म्हणून रविवार, दिनांक १ फेब्रुवारी रोजी पुष्पकुंज सोसायटी येथे भूमिपूजन सोहळा पार पडला. पर्यावरणपूरक कार्यक्रमांचा संकल्प करत यावेळी १०० वर्षे जुन्या वडाच्या झाडाचे पूजन अध्यक्ष व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. तसेच शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी रोजी हॉलिबाल ग्रुपच्या वतीने सर्व उपवस्त्यांमध्ये दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय दिनांक १२ व १३ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. संमेलनप्रसंगी आशीर्वचनासाठी प.पू. संत महंत अंबिका माऊली (ॐ नवशक्ती अंबिका भक्तीधाम, बोपापूर) उपस्थित राहणार आहेत. तर नागपूर येथील प्रख्यात वक्ते, लेखक व सामाजिक कार्यकर्ते अमोल पुसदकर हे प्रमुख वक्ते म्हणून आजच्या सामाजिक परिस्थितीवर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी पाच वाजता भजनसंध्येने होणार असून संमेलनाच्या समारोपानंतर उपस्थितांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ढाणकीत कीर्तन सोहळा

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**ढाणकी :** संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४० व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून, आज बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी ढाणकी येथील सराफा लाईनमध्ये भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी समस्त सराफा सुवर्णकार समाजाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून, परिसरातील भाविकांमध्ये एकच उत्साहाचे वातावरण आहे.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे आळंदी येथील सुप्रसिद्ध बाल कीर्तनकार ह.भ.प. अर्पिताताई मिराशे (अकोलीकर) यांचे रसाळ कीर्तन होणार आहे. अर्पिताताई आपल्या अमोघ वाणी आणि पांडित्यपूर्ण सादरीकरणामुळे अल्पवयातच लोकप्रिय झाल्या आहेत. त्यांचे कीर्तन सकाळी ११:०० वाजता सुरू होईल आणि त्यांच्या उपस्थितीने या धार्मिक सोहळ्याला आणखी एक आगळा रंग प्राप्त होईल. संत नरहरी महाराज हे सुवर्णकार समाजाचे आराध्य दैवत मानले जातात आणि त्यांच्या भक्तीचा वारसा जपण्यासाठी दरवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही, या भक्तीमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी ढाणकी आणि परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त सराफा सुवर्णकार समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. दिंडीच्या माध्यमातून पुण्यदायिनी नरहरी महाराज यांच्या चरित्राचा प्रसारही करण्यात येईल.




# देशाला सत्पुरुष हवेत, ते शाळेतूनच घडवावेत

## नगराध्यक्ष नालंदा भरणे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**आर्णी :** शाळा ही केवळ ज्ञानदानाची केंद्रे नसून, देशासाठी समर्पित सत्पुरुष घडवण्याची कार्यशाळा आहे. शिकलेली माणसे आपल्या कुटुंबासाठी जगतात, पण सत्पुरुष समाज आणि देशासाठी जगतात. म्हणूनच विद्यार्थ्यांना योग्य मूल्ये, चांगले विचार आणि ध्येयपूर्ण मार्गदर्शन देऊन सत्पुरुष बनवणे ही शिक्षणव्यवस्थेची प्राथमिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन आर्णी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष नालंदा भरणे यांनी केले.



उत्तमराव देशमुख इंग्लिश मीडियम स्कूल आणि मातोश्री शांताबाई तुकाराम चव्हाण विद्यालय, आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सप्तरंग २०२६' या दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात नर्सरी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पंडितराव चव्हाण होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष नालंदा भरणे यांच्यासह बालकल्याण सभापती चैताली देशमुख, नगरसेवक विशाल मनवर, भाजप शहराध्यक्ष विशाल देशमुख, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी किशोर रावते, प्रशासन अधिकारी सचिन तिरपुडे, संस्थेचे व्यवस्थापक उल्हास चव्हाण, गणेश मोरे, मुख्याध्यापक मंगेश ब्रम्हकार आणि कु. कोमल चव्हाण उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांची गरज असल्याचे सांगताना नगराध्यक्ष भरणे म्हणाल्या, "बालमनावर संस्कार करून सुजान, सदाचारी आणि देशभक्त नागरिक घडवणे ही शाळांची जबाबदारी आहे.

शिक्षणात मूल्ये जोपासली गेली तरच खऱ्या अर्थाने सत्पुरुष निर्माण होतील."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मंगेश ब्रम्हकार यांनी केले, सूत्रसंचालन आशिष मोरे यांनी केले तर आभार संस्थेचे व्यवस्थापक उल्हास चव्हाण यांनी मानले.

## इसमाची आत्महत्या

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**कळंब :** शहरातील प्रभाग क्रमांक १३, इंदिरा चौक परिसरात राहणाऱ्या एका ५५ वर्षीय इसमाने आर्थिक विवंचनेतून राहत्या घरी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. कैलास किसनाजी बावणे असे मृत व्यक्तीचे नाव असून, ते अवैध सावकारीच्या पाशात अडकल्याने तणावात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या घटनेमुळे बावणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कैलास बावणे हे रोजमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. १ फेब्रुवारी रोजी घरी कुणीही नसल्याची संधी साधून त्यांनी घराच्या अड्याला नायलॉन दोरी बांधून गळफास घेतला. सायंकाळी ही बाब निदर्शनास येताच परिसरात एकच खळबळ उडाली. बावणे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, भाऊ आणि सुना असा मोठा आप्तपरिवार आहे. मजुरी करणाऱ्या कैलास यांनी काही रक्कम व्याजाने घेतली होती, मात्र अवैध सावकाराचा तगादा आणि व्याजाची वाढती रक्कम यामुळे ते मानसिक विवंचनेत होते. याच आर्थिक ओढगस्तीतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. कळंब पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# परसोडा ग्रामपंचायतीने राबविला नाविन्यपूर्ण उपक्रम

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**आर्णी :** यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील परसोडा ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान (२०२५-२६) अंतर्गत नाविन्यपूर्ण आणि प्रभावी उपक्रम राबवून लक्ष वेधले आहे. या अभियानात ग्रामपंचायतींना स्पर्धात्मक वातावरणातून प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या या महत्वाकांक्षी योजनेत परसोडा गावाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी अलीकडेच परसोडा ग्रामपंचायतीची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी गावातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रशंसा करून सांगितले की, परसोडा जिल्हास्तरीय पुरस्कार स्पर्धेत आघाडीवर आहे. अशाच प्रकारची तयारी आणि उत्साह इतर ग्रामपंचायतींनीही राखावा, असे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले.

या पाहणीदरम्यान घरकुल लाभार्थ्यांच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले.

कार्यक्रमात आर्णी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमेश खारोडे, विस्तार अधिकारी इंगोले, ठाकरे, बघेल यांच्यासह सरपंच प्रा. सौ. स्वप्ना अतुल देशमुख, माजी सरपंच अतुल पाटील देशमुख, उपसरपंच सुनंदा पत्रे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर राठोड, अजाब पत्रे, मंगला चौधरी, मुख्याध्यापक बाबाराव वानखडे, नारायण वेट्टी तसेच महिला बचत गटाच्या सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे ग्रामपंचायतींना सक्षम, सुशासनयुक्त, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव बनवण्यासाठी, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय आणि लोकसहभागाच्या माध्यमातून लोकचळवळ निर्माण करण्यासाठी राबवले जात आहे. या अभियानात तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्य स्तरावर लाखो-कोटी रुपयांच्या पुरस्कारांची तरतूद आहे, ज्यामुळे ग्रामीण भागात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होत आहे. परसोडा ग्रामपंचायतीच्या या उत्कृष्ट तयारीमुळे गावाचा लौकिक वाढला असून, इतर गावांसाठीही प्रेरणास्थान ठरले आहे.

## अवैध दारू विक्री : महिलांचा पोलीस ठाण्यावर मोर्चा

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**पांढरकवडा :** घनमोड गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे गावातील सामाजिक सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. या समस्येचा विरोध करण्यासाठी, गावातील महिलांनी एकत्र येऊन पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला आणि निवेदन सादर केले. महिलांनी आरोप केला आहे की, मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री सुरू असून, मोटारसायकलद्वारे घरपोच दारू वितरित केली जात आहे. या विक्रीमुळे गावात भांडणे, शिवीगाळ, आणि दहशत निर्माण झाली असून, महिलांना आणि नागरिकांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.



महिलांचा दावा आहे की, दारू विक्री करणारे व्यक्ती, जेव्हा त्यांच्यावर तक्रार केली जाते, तेव्हा जीवे मारण्याची धमकी देतात. त्याचप्रमाणे, "पोलीस काही करू शकत नाहीत" असे ते खुलेआम सांगून दहशत पसरवत आहेत. त्याचवेळी, बीट अंमलदारावरही गंभीर आरोप केले गेले आहेत. महिलांचा आरोप आहे की, प्रत्येक रविवारी बीट अंमलदार दारू विक्रेत्यांकडून पैसे घेण्यासाठी जात असतात. यामुळे, अंमलदार आणि दारू विक्रेत्यांमध्ये काही आर्थिक संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व घटनांमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांनी सांगितले की, त्यांना कोणत्याही क्षणी मोठ्या घटनेची भीती आहे. महिलांनी प्रशासनाकडे तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी इशाराही दिला आहे की, जर दारू विक्रीवर तात्काळ कारवाई केली गेली नाही, तर महिला मंडळाच्या वतीने उपोषण करण्यात येईल. यामुळे, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे, आणि घनमोड गावाच्या महिलांनी आता त्यांच्या सुरक्षेसाठी आवाज उठवला आहे.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

* कर्तव्यात कसूर..
* भ्रष्टाचार भरपूर..
* कारवाईपासून दूर..
* मॅनेजचा सूर..!





# शेतकऱ्यांना अनुदानापासून ठेवले वंचित, कृषी सेवकांनी मालमत्ता केली संचित !

## १८ कृषी कर्मचाऱ्यांवर दिरंगाई व भ्रष्टाचार केल्याप्रकरणी कारवाई निश्चित

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सन २०२३-२४ मधील दुष्काळी निधी वाटपात झालेल्या भ्रष्टाचारापासून जिल्ह्यात अनेक घोटाळे चव्हाट्यावर येत आहेत. पोकरा भाग एक या योजनेतील गैरप्रकाराने तर वाशिम जिल्हा संपूर्ण राज्यात गाजत आहे. त्यातच कर्तव्यात कसूर करत अनेक शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कृषी विभागतील १६ ते १८ कर्मचारी दोषीं ठरले आहेत. त्या सर्व दोषींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र आर्थिक देवाण - घेवाण करून दोषीं कर्मचाऱ्यांची पाठराखण केली जात असल्यचा संशय व्यक्त केला जात आहे. परंतु कितीही पाठराखण केली तरी कर्तव्यातील कसूर अखेर भोवणार आणि कारवाई निश्चितच होणार आहे. या भ्रष्टकृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अनुदाणापासून वंचित ठेवले असून करोडोची मालमत्ता संचित केली आहे. त्यांच्या मालमत्तेची चौकशी करून त्यांच्यावर लवकरात लवकर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी होत आहे.






नैसर्गिक संकटाचा सामना करता करता राज्यातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. तर काही भागात सातत्याने गारपीट, अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ तर कधी हातात आलेले उभी पिके महापुरात वाहून गेली आहेत.परिणामी उत्पन्नाऐवजी शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. आर्थिक संकटात सापडलेल्या अनेक अन्नदात्यांनी गळफास आवळून आपली जीवनयात्रा संपवली आहे. यात वाशिम जिल्हा अग्रस्थानी असून एक आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित आहे. त्यामुळे केंद्र शासन असो अथवा राज्य शासनाच्या कृषी विषयक विविध योजनेत वाशिम जिल्ह्याचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. जेणेकरून जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या हतबल झालेल्या शेतकऱ्यांना योजनांचा लाभ देऊन शाश्वत उत्पन्नाची हमी मिळेल. या स्तुत्य हेतूने कृषी विभागांतर्गत अनेक योजना राबविण्यात येत आहेत. त्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजना ही खुप महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा पहिला टप्पा सन २०२५ मध्ये संपुष्टात आला असून सन २०२६ दुसरा टप्पा सुरू झाला आहे. मात्र पहिल्या टप्प्यात कृषी विभागाच्या काही कमिशनखोर अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी या महत्वाकांक्षी योजनेची वाट लावली आहे. त्यात काही दलाल शेतकऱ्यांनी हातभार लावत योजनेचा बट्ट्याबोळ केला आहे. ठराविक काही टक्के कमिशन मिळत असल्याने गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी आर्थिक लोभापायी एकाच कुटुंबात वेगवेगळ्या नावांवर लाखों रुपयांचे अनुदान वितरित केले आहे. तर काही अडाणी शेतकऱ्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेत बोगस अनुदान हडपले आहे. तर काही ठिकाणी सामूहिक लाभाच्या घटकात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले आहेत. परिणामी शासनाच्या स्तुत्य हेतुला ' खो ' देत भ्रष्ट व्यवस्थेने शेतकऱ्यांच्या नावावर स्वतःच्या आर्थिक तुंबड्या भरून घेतल्या आहेत. या बाबत अनेक तक्रारी समोर येत असून काही तक्रारी थेट वरिष्ठ स्तरांवर करण्यात आल्या आहेत. वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा योजनेची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहचली आहे. या गंभीर प्रकाराची चौकशी करण्यासाठी तपास अधिकारी नेमून प्राथमिक तपासणी पार पडली आहे. मात्र यात कारवाई काय झाली ? हा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

वरिष्ठांकडे अहवाल पाठविला असल्याची माहिती सबंधित तपास अधिकारी यांच्याकडून मिळत आहे. परंतु पुढील कारवाई किती दिवसाच्या कालावधीत होणार याची माहिती अद्यापही स्पष्ट झालेली नाही. त्यातच कामातील दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी कृषी विभागाच्या अनेक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झालेली आहे.

परंतु सदर कारवाई प्रलंबित असल्याने भ्रष्ट कर्मचारी चांगलेच शेफारले आहेत. आमचे कोणीही काहीही वाकडे करू शकत नाही! या आविर्भावात ' ये रे माझ्या मागल्या ' या म्हणी प्रमाणे सदर दोषी कर्मचाऱ्यांचा स्वैराचार सुरूच आहे. ही बाब पुढील शासकीय योजना राबविण्यासाठी धोकादायक ठरणारी आहे. या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून तातडीने दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करीत आहेत.


'पोकरा' योजनेत घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा !
*अनुदान लाटण्यासाठी 'बोगस' बिले सादर * रिसोड तालुक्यात काम अपूर्ण, अनुदान घेतले पूर्ण *पोकरातील सावळागोंधळ चव्हाट्यावर
गुरूवार दि.२४ जुलै २०२५
सरकारी जागेतील अतिक्रमित विहीर खाजगी सात- बारावरून हटावा
खाजगी व सरकारी जमिनीतील घुसखोरी थांबवा !
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५
कृषी सहायकाची मर्जी, अनुदान वाटप फर्जी !
रविवार दि.२४ ऑगस्ट २०२५
कृषी अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती, कामाची कागदावरच गती...
कुपनानेच खाल्ली शेती, योजनेची माती
अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपनानेच खाली शेती... त्यांचं कुत्र काशीला..
पोकरा योजनेची माती !
* पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी गरज * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर
जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करा !
शेतकऱ्यांच्या हक्काचा मलिदा लाट नाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा
*अन्यथा विधान भवनासमोर आंदोलन छेडण्यात येईल *किसान काँग्रेसचा ईशारा
'योजना शेतकऱ्यांसाठी, लाभ मात्र दलालांना - किसान काँग्रेस
कामात दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी...
अनेक कर्मचारी निलंबित, मात्र कारवाई प्रलंबित !
*कृषी विभागतील १६ कर्मचाऱ्यांवर, कारवाईची टांगती तलवार * बातमी बितंबित, कारवाई होणार निश्चित
कर्तव्यातील कसूर भोवणार, कारवाई निश्चित होणार !
कामात दिरंगाई अन् भ्रष्टाचाराचे अवलंबन...
१८ कर्मचाऱ्यांचे होणार निलंबन !
कृषी विभागतील 'दोषीं' कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार कायम
* कर्तव्यात कसूर.. * भ्रष्टाचार भरपूर.. *कारवाईपासून दूर.. *मॅनेजचा सूर..!
आदेशाचे धडकले पत्र, सुरू झाले कारवाईचे सत्र !
*अखेर शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणात कार्यवाही करण्याचे आदेश.
*अमरावती विभागीय कृषी सहसंचालक यांचे पत्र.
*क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कर्तव्यातील कसूराचा मागितला अहवाल.
भरकटलेल्या तपासात अधिकारी व कर्मचारी यांना पाठीशी घालण्याचा केविलवाणा प्रयत्न

## थोडक्यात

### आज पासून बिरबलनाथ महाराज यात्रा महोत्सव






●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळनाथ येथील योग तपस्वी संत श्री बिरबलनाथ महाराज यांच्या वार्षिक यात्रा महोत्सव ४फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विविध धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान यात्रा आयोजक रामकुमार रघुवंशी यांनी केले आहे संत श्री बिरबलनाथ महाराज यांनी पौर्णिमा दिनांक ४फेब्रुवारी १९२८ रोजी सायंकाळ ६ वाजता योग विद्येचा बळावर सजीव समाधी घेतली होती त्या समाधी निमित्त १ फेब्रुवारी रोजी अभिषेक होम व पूजा होणार असून सकाळी ११वाजता ह भ प उत्तम पाटील गावंडे वरुड यांच्या मधुर वाणीतून श्री बिरबलनाथ महाराज यांच्या लघुचित्राचे संगीतबद्ध वाचन होणार आहे.

महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे भाविकांनी शांततेत प्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान संस्थाकडून करण्यात आले आहे याच दिवशी रात्री ८ते १० या वेळात इंडियन आयडॉल फेम चेतन सेवा कुमार ऑर्केस्ट्रा केतक उमरा यांचा अंध मुले मुलीच्या संचासह भावगीत व भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता पालखी मिरवणूक तर दुपारी दहीहंडी व गोपालकाला कार्यक्रम ह भ प प्रतिभाताई पाटील आळंदीकर यांचा कीर्तनातून होणार आहे.

सायंकाळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ८ व ९ फेब्रुवारी रोजी उर्वरित स्पर्धा होतील १० फेब्रुवारी रोजी नाथ सेवा फाउंडेशन तर्फे भव्य रक्तदान शिबिर मोफत दंतपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .

## सिटीन्यूज सुपरफास्टची दखल, तहसीलदार रस्त्यावर दाखल...

# अवैध रेती तस्करांच्या मुसक्या आवळल्या , तस्करांचा 'गड' ढासळला !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक होत असल्याबाबत दैनिक सिटीन्यूज सुपरफास्टने अनेक मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून महसूल विभागाचे या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले होते. सदर वृत्तांची तातडीने दखल घेत रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी रेती तस्करांच्या मुसक्या आवळल्या. जिल्ह्या बाहेरील दोन तालुक्याच्या सीमा ओलांडून तालुक्यात येणाऱ्या अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर धडक कारवाई केली आहे. परिणामी अवैध रेती वाहतूक करणारे व रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईमुळे तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचा ' रुतबा ' पाहून महसूल विभागात त्यांच्या कर्तव्यदक्षतेचे कौतुक केले जात आहे. तर दुसरीकडे बेबोभाटपणे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या रेती तस्करांचा ' गड ' ढासळला असल्याचे बोलले जात आहे.





रिसोड तालुक्यात इतर तालुक्यातील घाटावरून येणाऱ्या रेतीची वाहने पथकाद्वारे तपासली असता विनापरवाना व नियमबाह्य वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर महसूल प्रशासनाने दोन स्वतंत्र कारवाया केल्या आहेत. सदर कारवाया तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या.या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या विशेष पथकाने तपासणी केली असता एका वाहनाकडे कोणत्याही प्रकारच्या वैध पावत्या अथवा परवाना नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर वाहनावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात आली.तसेच दुसऱ्या कारवाईत संबंधित वाहनाकडे पावत्या उपलब्ध असल्या तरी वाहनावर संरक्षणात्मक नेट नसणे तसेच निर्धारित मार्ग बदलून वाळू वाहतूक करण्यात आल्याने नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाले.

या वाहनावर स्वतः तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर तसेच ग्राम महसूल अधिकारी उसारे यांनी प्रत्यक्ष कारवाई केली. सदर दोन्ही कारवाया रेती घाटावरून वाळू वाहतूक करताना दोन तालुके ओलांडून रिसोड तालुक्यात प्रवेश केल्यानंतर करण्यात आल्या. त्यामुळे अवैध उत्खनन व वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून उत्खलन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.या कारवायांमध्ये मंडळ अधिकारी एच. डी. जावळे, मंडळ अधिकारी सुभाष जाधव, ग्राम महसूल अधिकारी आर. पी. जाधव व महसूल सेवक देवराव कांबळे यांनी सहभाग घेतला.

तपासणीदरम्यान एम. एच. १७ सी. व्ही. ३४३२ क्रमांकाचे वाहन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर दोन्ही वाहने पुढील कायदेशीर कारवाईसाठी परिवहन विभागाकडे पाठविण्यात आली आहेत. अवैध उत्खनन व अवैध वाळू वाहतुकीविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील, अशी माहिती तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी दिली आहे.

# वंचितच्यावतीने ना. गिरीश महाजन यांच्या राजीनाम्याची मागणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वंचित बहुजन आघाडी जिल्हाच्या वतीने महासचिव प्रा.रंगनाथ धांडे यांच्या नेतृत्वात देण्यात आले. त्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी नाशिक जिल्ह्याचे पालक मंत्री मा.नामदार गिरीश महाजन यांनी स्वतंत्र भारताचे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या आपल्या भाषणात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव घेण्याचे मुद्दामून टाळले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने वंचित बहुजन आघाडी जिल्हा वाशिम तीव्र शब्दांत निषेध करण्यात




आला. या निवेदनावर जिल्हा महासचिव प्रा.रंगनाथ धांडे,महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतीताई इंगळे,विनोद भगत, संतोष सरकटे,समाधान भगत, बाळासाहेब खंडारे,सुशीला खाडे,गोविंद वर्मा,अमोल पखाले,समाधान मोरे,सुनिता खाडे, सरेश सोनोने,अनंत कुमार जुमडे,दिपक आगलावे,वसंतराव राठोड, एकनाथ भगत,सूर्यप्रकाश भगत, दिलीप भगत, स्वप्नील खडसे,अरुण भगत, किरण खडसे,वैभव खडसे आदींच्या सह्या आहेत.

## संजीवनी सेवाभावी परिवाराचा २७ वा वर्धापन दिन

# तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना राजमाता माँ जिजाऊ पुरस्कार !

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड येथून जवळ असलेल्या डोणगाव(जि. बुलढाणा) येथे संजीवनी सेवाभावी परिवाराच्या २७व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रिसोड (जि. वाशिम) येथील तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना राजमाता माँ जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दि. १ फेब्रुवारी रोजी आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.




राजमाता माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद व आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना त्यांच्या प्रशासकीय कार्यकुशलतेबद्दल, सामाजिक संवेदनशीलतेबद्दल व कर्तव्यनिष्ठ सेवाभावाबद्दल राजमाता माँ जिजाऊ पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांनी मनोगतातून जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या बळावर यश प्राप्त करता येते, असा संदेश उपस्थितांना दिला.कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा तसेच गुणवंत व्यक्ती व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. आयोजकांच्या वतीने मान्यवरांचे शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन आयोजकांनी केले. संजीवनी सेवाभावी परिवाराच्या या वर्धापन दिन सोहळ्यामुळे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याला नवचैतन्य मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# बाळाखेडा होणार प्लास्टीक मुक्त, गाव होणार पर्यावरण युक्त !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत रिसोड तालुक्यातील बाळखेड ग्रामपंचायत च्या वतीने गावात प्लास्टिक बंदी करण्याच्या उद्देशाने एक मताने निर्णय घेतला. गावामध्ये वैयक्तिक तसेच सार्वजनिक सण उत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम जसे की लग्न समारंभ, सप्ताह अशा सर्व प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये प्लास्टिकच्या वस्तूचा बेसुमार वापर होत असतो.ज्यामध्ये प्रामुख्याने द्रोण, प्लास्टिक पात्रवाळी, द्रोण, ग्लास ,चहा ग्लास हे वापरल्या जातात यापासून अनेक जनावरांना बाधा होते.तसेच पर्यावरणाची मोठी हानी होते.पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी बाळखेड ग्राम पंचायतने गावामध्ये प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे.

प्लास्टिक वस्तूंना बंदी घालणारे बाळखेड हे जिल्ह्यातील पहिले गाव असून बाळखेडच्या



*प्लास्टिक मुक्त गावासाठी ग्रामस्थांचा एकमताने निर्णय'
* बाळखेड ग्रामस्थांचा स्तुत्य उपक्रम.

तरुण महिला सरपंच राणी सचिन पऱ्हाड यांनी प्रथमता स्वतःपासून प्लास्टिक बंदीचा निर्धार करत,गावातील सार्वजनिक कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणात प्लास्टिक ग्लास,पत्रावळी, द्रोण,ग्लास,आदी वापरले जातात. मात्र यापासून गावामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा कचरा होतो.पर्यावरणाची हानी होऊन याचा मुक्या जनावरांना जीव देखील गमवावावा लागतो. यामधून कायम स्वरुपी मार्ग काढण्यासाठी सरपंच राणी सचिन पऱ्हाड यांनी गावामध्ये स्टीलचे ताट सातशे, पाणी ग्लास पाचशे पन्नास,चहा कप तिनशे पन्नास,नाश्ता प्लेट तिनशे पन्नास,हे उपलब्ध करून दिले असून त्याचे शुभारंभ ह.भ.प. गणेश महाराज हुंबाड यांच्या हाताने शुभमुहूर्त करून गावात चालू असलेल्या सप्ताह निमित्त त्याचा वापर सुरू करण्यात आला आहे.यावेळी सरपंच, उपसरपंच,सर्व सदस्य व गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते.

**गाव करी ते राव न करी**

आमच्या गावामध्ये आम्ही एकमताने गावामध्ये प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे.लग्न समारंभ तसेच अन्य कार्यक्रमांमध्ये मोठया प्रमाणात प्लास्टिक पत्रावळी, द्रोण, ग्लास,चहा कप यांचा वापर होतो.या सर्व प्लास्टिकच्या वस्तूंना अन्न पदार्थ चिकटतात त्यामुळे अनेक जनावरे ते खाल्याने मृत्यू पावतात.दुसरीकडे हे प्लास्टिक जाळल्यामुळे वायू प्रदूषण होऊन पर्यावरणाची मोठी हानी होते. प्लास्टिक पासून होणारे आजार बळावतात. यावर कायम स्वरुपी मार्ग निघावा यासाठी आम्ही मोठ्या प्रमाणावर स्टीलचे ग्लास,जेवणाचे ताटे,प्लेट, खरेदी करून वापर सुरू केला आहे. गावकऱ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेऊन प्लास्टिक बंदीच्या यज्ञात सहभागी व्हावे.

**प्लास्टिक बंदीचे फायदे**

१) पर्यावरण स्वच्छ राहते

रस्ते, नाले, शेतजमीन आणि पाण्याचे स्रोत प्लास्टिक मुक्त राहतात. कचरा कमी झाल्यामुळे गाव सुंदर व स्वच्छ दिसते.

२) आरोग्य सुधारते

प्लास्टिक जाळल्या मुळे होणारे धूर व प्रदूषण कमी होते. त्यामुळे श्वसनाचे व त्वचा रोगांचे प्रमाण घटते.

३) जनावरांचे संरक्षण गुरे- ढोरे प्लास्टिक खाण्याचा धोका टळतो, त्यामुळे त्यांचे आरोग्य सुरक्षित राहते.

४) प्लास्टिक नष्ट होण्यास अनेक वर्षे लागतात.प्लास्टिक बंदीमुळे पाणी व माती प्रदूषण कमी होऊन मातीची सुपीकता व पाण्याची शुद्धता टिकून राहते.

५) कचरा व्यवस्थापन सोपे


कचरा वर्गीकरण व पुनर्वापर सुलभ होतो, त्यामुळे स्वच्छता राखणे सोपे जाते.

## श्री समर्थ सेवा मंडळाच्या वतीने

# दासनवमी उत्सवास प्रारंभ

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

श्री समर्थ सेवा मंडळ वाशीम च्या वतीने २ ते १० फेब्रुवारी दरम्यान श्री करुणेश्वर मंदिर, गणेश पेठ वाशीम येथे दासमवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमीत्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार असून, या कार्यक्रमाचा शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता अभिषेक पुजा रवि कोरान्ने यांच्या हस्ते, सद्गुरु शंकर बाबा यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम पार पडले. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान भक्ती संगीत, संदिप देशमुख आणि संच, वाशीम, ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजता दरम्यान उपासना, ९ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजता दरम्यान श्री समर्थ रामदास स्वामी या विषयावर राष्ट्रीय किर्तनकार चारुदत्त आफळे गुरुजी, पुणे यांचे सुश्राव्य किर्तन, १० फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजता दरम्यान संताचा महिमा या विषयावर पंकज महाराज देव यांचे प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री करुणेश्वर मंदिर, गणेश पेठ वाशीम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# अकोट फाईल उड्डाणपुलावर ट्रॅफिकचे तीन तेरा

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** न्यू तापडीया नगर उड्डाणपुल तयार झाला नाही. त्यामुळे जड आणि चार चाकी वाहतुक अकोट फाईल रेल्वे उड्डाणपुलावरुन होते. हा उड्डाणपुल देखील शेवटच्या घटका मोजत आहे. पण, या उड्डाणपुलावर रोज ट्राफिक जॅम ची समस्या असून त्याकडे कोण लक्ष देणार असा प्रश्न विचारला जात आहे.

अकोट फाईल उड्डाणपुल शहरातील अकोट फाईल, नायगाव, शिलोडा, न्यू तापडीया नगर, बापू नगर, पंचशील नगर, खरप या शहरातील भागांना तर जोडतोच. पण, त्याच बरोबर या उड्डाणपुलावरुन



अकोट, अनसिंग, परतवाडा, दर्यापूर, घुसर, आपातापा या मार्गावरुन मोठ्या संख्येत फोर व्हिलर धावातात. सकाळी गर्दीच्या वेळी आणि सायंकाळी परतीच्या वेळी या उड्डाणपुलावर ट्राफिक जॅम ही समस्या गंभीर होत चालली आहे. त्यात मालधक्क्यावरील मोठ मोठाले ट्रक हे जडवाहतुक बंद असताना भरधाव धावतात. याकडे प्रशासनाचे, शहर वाहतुक शाखेचे तर दूर्लक्ष आहे. त्याच बरोबर जिल्हा प्रशासनाचे देखील दूर्लक्ष आहे. त्यामुळे हजारो नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पण, या समस्येकडे लोकप्रतिनिधींचे दूर्लक्ष असल्याने लोकांच्या त्रासात भर पडत आहे. आरआरसी न्यूजच्या टिम सोबत विद्यार्थ्यांनी संवाद साधला. जे गोष्ट विद्यार्थ्यांना समजते ती प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना का उमजत नाही असा प्रश्न विचारला जात आहे.

### नेहमीचीच झाली डोकेदुखी या उड्डाणपुलावर रहदारी

◆ विस्कळीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे लोकांना दररोज त्रास सहन करावा लागतो. परंतु वारंवार लक्ष वेधून देखील मार्ग निघत नाही. मुख्य म्हणजे वाहने खोळंबली असतात परंतु वाहतूक शिपाई दिसत नाही. लोकांची सारखी तारांबळ उडते. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्याशिवाय गत्यंतर नाही.

# उन्हाळ्याची चाहूल, मातीच्या माठांना मोठी मागणी

### आरोग्यदायी आणि नैसर्गिक असल्याने ग्राहकांची पसंती

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** उन्हाळ्याच्या आगमनासोबतच शहराच्या बाजारपेठेत 'देशी फ्रीज' म्हणजेच मातीच्या माठांची मागणी प्रचंड वाढली आहे. एकेकाळी केवळ गावापुरते मर्यादित असलेले हे माठ आता शहरी लोकांचीही पहिली पसंती ठरत आहेत. वाढत्या उन्हात लोक आता आरोग्यदायी आणि नैसर्गिक पर्यायांकडे वळताना दिसत आहेत.

मातीपासून बनवलेले हे 'देशी फ्रीज' विजेविना नैसर्गिकरित्या पाणी थंड ठेवण्याचे काम करतात.



तज्ज्ञांच्या मते, माठातील पाणी केवळ थंडच नसते, तर ते शरीराला आवश्यक खनिजे देखील पुरवते. स्टील आणि प्लास्टिकच्या बाटल्यांच्या तुलनेत माठातील पाणी अधिक आरोग्यदायी मानले जाते. याच कारणामुळे आता शहरांमध्येही लोक आधुनिक फ्रीजचा मोह सोडून पारंपरिक माठांकडे वळत आहेत. स्वस्त आणि मस्त असण्यासोबतच हे माठ पर्यावरणासाठीही पूरक आहेत. दुकानदारांच्या मते, यंदा माठांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. जसजसा उन्हाचा कडाका वाढेल, तसतशी विक्री अजून वाढण्याची शक्यता आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीत लोक आता आरोग्य आणि परंपरा या दोन्ही गोष्टींची सांगड घालताना दिसत आहेत. 'देशी फ्रीज' म्हणजेच हे मातीचे माठ पुन्हा एकदा आपले स्थान निर्माण करत आहेत.



# नागरी सुविधा की असुविधा केंद्र

### ◆ नागरिकांना पडला प्रश्न

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी महापालिकेने टिळक रोडवर भरतिया रूग्णालयाच्या आवारात नागरी सुविधा केंद्र सुरू केले आहे. परंतु या ठिकाणी कामे लवकर होत नसल्याने रांगेत उभे राहावे लागत आहे. पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. तसेच कनेक्टिव्हिटी नसेल तर वाट पाहण्यासाशिवाय गत्यंतर नाही. विविध प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्यामुळे नागरिक त्रासले आहे. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी केंद्रात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसते. त्यामुळे संबंधितांची वाहने रस्त्यावर उभी राहतात. त्या शिवाय दुसरा



मार्ग नाही. त्यामुळे हे सुविधा की असुविधा केंद्र आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेकांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना नाराजी व्यक्त केली. लोकांना जन्म मृत्यू प्रमाणपत्र विविध कामांसाठी आवश्यक असते. त्यामुळे ते तातडीने उपलब्ध व्हावे अशी अपेक्षा असते. मात्र सध्या विविध कारणांमुळे होत असलेला विलंब दूर व्हावा अशी नागरिक अपेक्षा व्यक्त करीत आहेत. महापालिका प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन व्यवस्था करावी. तसेच संबंधितांना प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध होईल याकडे लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे. महत्त्वाच्या डॉक्यूमेंट साठी खोळंबा होत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी संबंधितांची अपेक्षा आहे.

# वाढदिवस साजरा न करण्याचा कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा निर्णय

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आपला उद्याचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, 'राज्याने आपला एक जननायक आणि ज्येष्ठ मार्गदर्शक गमावला आहे, अशा संकटकाळात कोणताही आनंदोत्सव साजरा करणे माझ्या मनाला कदापि पटणारे नाही.' स्व, अजित पवार यांच्याप्रती आदर आणि श्रद्धांजली म्हणून त्यांनी सर्व नियोजित कार्यक्रम तातडीने रद्द केले आहेत. आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांसाठी विशेष सूचना जारी केल्या आहेत वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचे कोणतेही बॅनर, पोस्टर्स किंवा जाहिराती लावू नयेत. हार, पुष्पगुच्छ किंवा मिठाई घेऊन कोठेही एकत्र येऊ नये. उद्या मंत्री महोदय स्वतः मतदारसंघात उपस्थित राहणार नाहीत.

# अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे अजित दादांना श्रद्धांजली



प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला:** उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखेचे वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या शोकसभेत महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार, लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख, प्रा. प्रकाश डवले, प्रदीप खाडे, पंजाबराव वर, डॉ. श्रीकांत काळे, महिला विभागीय अध्यक्ष कल्पनाताई बिडवे, बुढण गाडेकर, अजय मते, मधुकरराव देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अजित दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. अजित दादांची काम करण्याची शैली, धडाडी तसेच सामाजिक, राजकीय इतर क्षेत्रात त्यांचं योगदान या संदर्भात मान्यवरांनी आपलं मनोगत व्यक्त केले. यावेळी योगेश थोरात, माधुरी वाघमारे, संजय सूर्यवंशी श्रीकांत सरोदे अरुण खोटरे, विठ्ठलराव वाघ काशिनाथ पटेकर, प्रदीप लुगडे, विक्रम वाघमारे, उज्वला बावस्कर, छाया पवार, सीमा लोणकर, सविता राऊत, नरेश सूर्यवंशी, दीपक नाकट, राजू पाटील वाहिले, डॉ. प्रकाश गोंड, रामा पाटील, साखरकर गुरुजी, दीपक गावंडे, शुभम झांबरे आदी उपस्थित होते.

# प्रभाग बारा मधील नागरिकांसाठी चोवीस तास उपलब्ध, नगर सेवक सागर भारूका यांची ग्वाही

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** महापालिका निवडणुकीपूर्वी प्रभाग क्रमांक बारा मधील जनतेला दिलेल्या वचन पूर्तीसाठी कटिबद्ध आहोत. निवडून आल्यानंतर खाटू श्याम बाबांचे दर्शन आशीर्वाद घेऊन विकास कामांना सुरूवात केली. प्रभागातील असुविधा दूर करण्यासाठी हा सच्चा सेवक चोवीस तास उपलब्ध आहे असा शब्द नगर सेवक सागर भारूका यांनी प्रभागातील जनतेला दिला आहे.

सद्यस्थितीत प्रभाग बारा मध्ये झपाटल्यागत विकास कामे करताना शिवसेना उबाठाचे नगरसेवक सागर भारूका दिसतात. निवडणूक प्रचारा



दरम्यान त्यांनी काम करण्याची जिद्द दाखवली होती. एक झुंजार शिवसैनिक आणि सच्चा सेवक म्हणून प्रभागातील समस्या सोडवताना ते दिसतात. दररोज सकाळी साडेसहा वाजता नाल्या, रस्ते सफाई, बोअरिंग, हॅंडपंप दुरूस्ती करवून घेतात. लहुजी वस्ताद नगर, अनिकट भागात सागर भारूका यांनी स्वखर्चाने बोअरिंग, लाईट व्यवस्था करून दिली. गोपाल कुटीया मागील मोठ्या नाल्याची स्वच्छता कित्येक वर्षे झाली नव्हती ती करवून घेतली. राजकारण माझा धंदा नाही असे भारूका यांचे स्पष्ट मत आहे. महसूल कॉलनीत जीमचे उदघाटन, पेवर्स कामाला सुरुवात झाली. भाटे क्लब परिसर स्वच्छ करून घेतला. गेल्या पंधरा सोळा दिवसात काही ट्रक कचरा उचलला. महापालिका अधिका-यां मार्फत कामे सुरू आहेत. झपाट्याने सुरू असलेल्या कामांमुळे सागर भारूका यांनी आपली छाप पाडली आहे. आपल्याकडे आलेली समस्या दहा मिनिटांत सोडवण्याचे अभिवचन त्यांनी दिले आहे.

# ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवित नोंदवला निषेध

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**खामगाव :** तालुक्यातील सुटाळा बु ग्रामपंचायत मध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर काळे झेंडे दाखवित निषेध आंदोलन केले. यावेळी गटविकास अधिकारी उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. सुटाळा बु, ग्रामपंचायतीत २६ जानेवारी रोजी आयोजित ग्रामसभेत ग्रामस्थांनी सरपंच, ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्यांना विविध विकास कामांवर झालेल्या खर्चाचा हिशेब विचारला; मात्र या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता संबंधित अधिकारी व पदाधिकारी ग्रामसभा अर्ध्यावरच सोडून निघून गेले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असून, भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, प्रशासकीय अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या पलायनाच्या निषेधार्थ संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर 'डफडे बजाव' आंदोलन करून निषेध व्यक्त केला. त्यानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली न गेल्याने पंचायत समितीसमोर काळे झेंडे दाखवित आंदोलन करण्यात आले. ग्रामस्थांनी दिवसांपूर्वीच निवेदन देत आंदोलनाची पूर्वसूचना दिली होती. तरीही गटविकास अधिकारी कार्यालयात अनुपस्थित होते. त्यामुळे ग्रामस्थांचा उद्रेक आणखीच वाढला. दोषींवर कारवाई न झाल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी यावेळी दिला.

# जिल्ह्यातील 133 गावांच्या आराखड्याला मान्यता

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोला :** 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी टप्पा २' अंतर्गत जिल्ह्यातील १३३ गावांचा समावेश असलेल्या आराखड्याला आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेतील जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्हा अधीकक कृषी अधिकारी हरीश देशमुख, 'आत्मा'चे संचालक डॉ. मुरली इंगळे, उपविभागीय अधिकारी विवेक बि-हाडे, तुषार ठाकरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. प्रकल्पाद्वारे लहान शेतक-यांची क्षमता, संसाधनांचा कार्यक्षम वापर, स्पर्धात्मक उत्पादन



प्रणालीला चालना देणे, काटेकोर शेती पद्धतीद्वारे कर्ब उत्सर्जन कमी करणे, हवामान अनुकुल तंत्रज्ञानाचा वापर, संस्थात्मक बांधणी व नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळणार आहे. या माध्यमातून वृक्षलागवड, फळबाग लागवड, खतनिर्मिती, सिंचन, बंदिस्त शेळीपालन, रेशीम शेती अशा अनेक बाबींसाठी शेतक-यांना अर्थसहाय्य मिळणार असून, अधिकाधिक शेतकरी बांधवांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी मीना यांनी दिले. प्रकल्पात वैयक्तिक, सामाईक व शेतकरी उत्पादक कंपनी, महिला बचत गट, इतर गट स्तरावर अर्थसाह्य दिले जाते. प्रकल्पात अकोला तालुक्यातील २०, बाळापूरमधील १२, बार्शिटाकळीतील ३२, मूर्तिजापूरमधील १३, पातूरमधील १४, अकोटमधील २९, तेल्हारामधील १३ गावांचा समावेश आहे, अशी माहिती एसएओ देशमुख यांनी दिली.

# अकोट तालुक्यातील मौजे बेलोरा मध्ये वन विभागाच्या जागेत वृक्षतोड

### अवैध वृक्षतोडीला आळा घालण्याची आवश्यकता

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**अकोट:** तालुक्यातील मौजे बेलोरा येथील गट क्रमांक सोळा मधील राखीव वन कंपार्टमेंट बी - ११ मध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात राखीव वन मालमत्तेमध्ये अवैध उत्खनन व अवैध वृक्षतोड करण्यात आली आहे. यावर संबंधीत विभागाने कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

मौजे बेलोरा येथील गैर कायदेशीर उत्खनन झालेल्या ठिकाणची लांबी अंदाजे सहाशे ते सातशे मिटर आहे तर रूंदी अंदाजे बारा ते पंधरा मिटर आहे व उंची अंदाजे तीन ते चार मिटर आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्खनन करून लाखो ब्रास मुरूम खोदुन नेण्यात आलेला आहे तसेच हजारों वृक्षांची कत्तल करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यावर आधारित पशु, पक्षांचे अतोनात नुकसान झाले



आहे. तसेच बायोडाव्हरसिटी सुद्धा नष्ट झाली आहे. त्यामुळे संरक्षीत, राखीव वनाला खुप मोठे नुकसान पोहचविण्यात आले आहे. सदरहू मालमत्ता ही सार्वजनिक शासकीय संपत्ती असुन ती वनविभागाच्या अखत्यारीत येते. या संपूर्ण संपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची आहे, परंतु ज्या विभागाचे हत्यारित हा संपूर्ण प्रकार येतो त्या विभागाला माहिती कसे नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. या बाबत चौकशी करून कारणीभूत असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी याकरिता निसर्गप्रेमी शेख मोहम्मद शेख मकबुल यांनी तक्रार दाखल करत कारवाई ची मागणी केली आहे. एकीकडे शासन वनसंपदेच्या संरक्षणासाठी उपाययोजना राबवित असून दुसरीकडे अकोट तालुक्यात होत असलेल्या वनसंपदेचा नाश हा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे, येणाऱ्या काळात यावर अंकुश न लावल्यास भविष्यात याचे विपरीत परिणाम निर्माण होतील अशी शक्यता निसर्ग प्रेमींकडून व्यक्त केल्या जात आहे.

# खामगांव अर्बन बॅंकेस सलग दुसऱ्या वर्षी आयकॉनिक लिडरचा पुरस्कार

प्रतिनिधी ४ फेब्रुवारी

**खामगाव :** आयकॉनिक लीडर्स अवार्ड २०२५ च्या दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळ्यात विदर्भाच्या सहकार क्षेत्रातील नावलौकीक प्राप्त दि खामगांव अर्बन मल्टीस्टेट शेड्युल्ड बॅंकेला बॅंकिंग टेक प्रोजेक्ट ऑफ द इयर विषयात पुरस्कार प्राप्त झाला आहे. बॅंकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्व, नवकल्पना आणि अत्याधुनिक प्रगतीशिल बैंक म्हणून दिला जातो. बॅंकेचे अध्यक्ष प्रा. विजय पुंडे, मुख्य व्यवस्थापक संतोष जाधव व सहा. व्यवस्थापक आशिष दधिच यांनी पुरस्कार स्वीकारला.

खामगांव अर्बन बैंक परिवाराच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना सार्थ अभिमान वाटतो असे मनोगत बॅंकेचे अध्यक्ष प्रा. विजय पुंडे यांनी व्यक्त केले. खामगांव अर्बन बॅंकेने नेहमीच



ग्राहकांना सुविधा देण्याकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत नवकल्पना आणि अत्याधुनिक प्रगतीशिल बॅंकींग सेवा देत आहे. यापुढेही अधिकाधिक तंत्रज्ञानयुक्त तत्पर व सुरक्षित सेवा देण्याचा मानस आहे. बॅंकेने सभासद खातेदार यांच्याकरीता ठेवींवर आकर्षक व्याजदर व कर्जावर माफक व्याजदारांच्या विविध कर्ज योजना सुरु केलेल्या आहे. त्यामुळे बॅंकेच्या नफा वाढीस फायदा झाला आहे. बॅंकेचे स्वतःच्या जागेत अकरा शाखेत एटीएम कार्यरत असून, यापासून स्थानिक ग्राहकांना व इतर बॅंकांच्या एटीएम धारकांना सेवा देत असते. त्याचप्रमाणे बॅंकेच्या ग्राहकांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत चला डिजीटल होऊ या या ब्रिद वाक्यासह आयएमपीएस सुविधा, आरटीजीएस, एनईएफटी, टोल फ्री बॅंकिंग, मोबाईल बॅंकिंग, एसएमएस अलर्ट व यूपीआय सुविधा देणारी सहकार क्षेत्रातील विदर्भातील अग्रणी बॅंक आहे. तर पर्सनल चेक बुक फॅसिलीटीचे बॅंकेतच प्रिंट करून खातेदारास चेक वितरीत करण्यात येते. खामगांव अर्बन बॅंकेस पुरस्काराने सन्मानीत केल्याने सभासद, ग्राहक, संचालक मंडळ व कर्मचारी वर्गात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK